आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १९ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -३०२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 19 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-302 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सत्ताधारी-विरोधकांच्या जोर 'बैठका'

## विरोधकांनी फुंकले लोकसभा निवडणुकीचे बिगुल

आधुनिक केसरी न्यूज



**बंगळुरू :** देशातील विरोधी पक्षाच्या प्रमुखांची बंगळुरुत मंगळवारी महत्वाची बैठक झाली. या बैठकीत आघाडीचे नाव निश्चित करण्यासह काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत 26 पक्षांच्या प्रतिनिधींनी हजेरी लावली. विरोधकांनी आपल्या आघाडीला INDIA असे नाव दिले आहे. तर, जागा वाटप आणि इतर मुद्यांसाठी 11 सदस्यांची समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले.

बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, देशातील लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी विरोधी ऐक्याची ही बैठक महत्वाची आहे. या बैठकीत सर्वानुमते इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इनक्लुसिव्ह अलायन्स हे नाव आघाडीला द्यायचे ठरले आहे. विरोधकांची 26 पक्षांची एकजूट पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 30 पक्षांची बैठक बोलावली आहे. मात्र हे पक्ष नोंदणीकृत तर आहेत का? असा सवाल त्यांनी केला. आधी पंतप्रधान मोदी मित्रपक्षांसोबत बोलत देखील नव्हते. मात्र आता एकेकाला गोळा करतायत. विरोधकांच्या एकजुटीचा त्यांनी धसका घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, आघाडीची पुढील बैठक मुंबईत होणार आहे. पुढील बैठकीत समन्वय समितीची बैठक होणार आहे. या समितीत 11 सदस्य असणार आहेत. त्यातील नावांबाबत पुढील बैठकीत निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले की, एनडीए आणि इंडिया यांच्यात लढत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि India यांच्यात लढत आहे. त्यांची विचारधारा आणि भारत यांच्यातील संघर्ष आहे. आम्ही एक कृती आराखडा तयार करू आणि एकत्रितपणे आम्ही देशात काय करू इच्छितो हे सांगणार असल्याचे त्यांनी सांगितले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी म्हटले की, आजची बैठक महत्वाची आणि फलदायी ठरली. आज आम्ही एक आव्हान स्वीकारल आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील NDA ला या आमच्या INDIA चे आव्हान स्वीकारता येणार नाही. हिंमत असेल तर हे आव्हान स्वीकारावे, असे आव्हान त्यांनी दिले. देशाला वाचवण्यासाठी हे विरोधकांचे IN-DIA काम करेल. कोणी सरकारला आव्हान दिले तर सीबीआय आणि इतर यंत्रणा मागे लावल्या जातात. INDIA जितेगा... NDA हारेगा असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बिहारमध्ये एनडीएचे जागावाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बिहारमधील लोकसभेच्या जागा वाटपावर अखेर एनडीएने शिक्कामोर्तब केले आहे. बिहारमधील एकूण ४० जागांपैकी भाजप आणि नितीशकुमार यांचा जेडीयू पक्ष प्रत्येकी १७ जागांवर लढणार असून रामविलास पासवान यांच्या लोकजनशक्ती पार्टीला ६ जागा सोडण्यात आल्या आहेत. तशी अधिकृत घोषणाच मंगळवारी करण्यात आली.

भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी जागा वाटपासंदर्भात महत्त्वाची बैठक झाली. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री, जेडीयूचे नेते नितीश कुमार आणि लोजपाचे अध्यक्ष रामविलास पासवान उपस्थित होते. बैठकीनंतर या तिघांनी पत्रकार परिषद घेऊन जागा वाटपाची अधिकृत घोषणा केली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिहारमध्ये एनडीएच्या घटक पक्षांच्या जागा वाटपावर शिक्कामोर्तब झाले आहे. मात्र कोणत्या मतदारसंघातून कोण लढेल यावर बिहारचे नेते चर्चा करून निर्णय घेतील, असे अमित शहा यांनी सांगितले. फॉर्म्युल्यानुसार एनडीएकडून रामविलास पासवान यांना राज्यसभेवर पाठवण्यात येणार आहे, असे नितीश कुमार यांनी स्पष्ट केले.

> रामविलास पासवान गेल्या काही दिवसांपासून भाजपवर नाराज होते. त्यांनी नोटाबंदीचा मुद्दा उकरून काढत भाजपवर टीकाही केली होती. त्यामुळे पासवान एनडीएतून बाहेर पडतील अशी चर्चा होती. शिवाय जागा वाटपात पासवान यांनी सात जागांचा हट्ट लावून धरला होता. त्यामुळे भाजपला पासवान यांना लोकसभेच्या सहा जागा आणि राज्यसभेची एक जागा देऊन थोपवावे लागल्याचे सूत्रांनी सांगितले.
>
> बिहारमधील महाआघाडी कायम रहावी म्हणून जागा वाटपात भाजपने नमते घेतल्याचे दिसून आले आहे. २०१४ मध्ये भाजपने बिहारमध्ये ३०, लोजपाने ७ आणि रालोसपाने तीन जागांवर निवडणूक लढली होती. त्यात भाजपला २२ जागांवर लोजपाला सहा आणि रालोसपाला तीन जागांवर विजय मिळाला होता. तर भाजपपासून फारकत घेऊन स्वतंत्र लढणाऱ्या जेडीयूला अवघ्या दोन जागांवर विजय मिळविता आला होता. मात्र आता जेडीयूचा एनडीएत समावेश झाल्याने भाजपने पाच जागांवर माघार घेत या जागा जेडीयूसाठी सोडल्या आहेत.

भाजपने पासवान यांची प्रतिष्ठा राखल्याबद्दल नितीश कुमार यांनी यावेळी आभार मानले. तर केंद्रात पुन्हा एनडीएचीच सत्ता येणार असल्याचे पासवान यांनी स्पष्ट केले.



# अमरनाथच्या बाबा बर्फानींना शेतकऱ्याकडून कांद्याचा प्रसाद

## केंद्र व राज्य सरकाला सुबुद्धी देवो म्हणत केली प्रार्थना

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** जम्मू-काश्मीर राज्यातील प्रसिद्ध देवस्थान व पवित्र गुंफा म्हणून बाबा अमरनाथ व तेथील यात्रा उत्सव देशात व देशाबाहेर प्रसिध्द आहे. निफाड तालुक्यातील नैताळे येथील कांदा उत्पादक शेतकरी संजय साठे यांनी आपल्या स्वतःच्या घरुन पाच किलो कांदे घेऊन अमरनाथ यात्रेचा प्रवास सुरु केला. तब्बल सहा दिवसांच्या रेल्वे, घोड्यावरील, पायी प्रवासानंतर तो पाच किलो कांदा बाबा अमरनाथ यांना प्रसाद म्हणून अर्पण केला. कांदा पिकाला योग्य भाव मिळू दे.. कांदा आयात निर्यातीचे योग्य धोरण ठरविण्यास केंद्र व राज्य सरकारला सुबुध्दी दे.....! अशा प्रकारची प्रार्थना करुन तो कांद्याचा प्रसाद तेथे उपस्थित असलेल्या व देशसेवेसाठी रात्र दिवस पहारा करणाऱ्या सैनिकांनाही दिला.

हा उत्सव जम्मु-काश्मीर राज्यात १ जुलै २०२३ पासुन सुरु झाला आहे. नैताळे येथील कांदा उत्पादक शेतकरी संजय साठे अमरनाथ यात्रेसाठी सोबत पाच किलो कांदे घेऊन बाबा बर्फानीच्या पवित्र गुंफेत समोर असलेल्या दानपेटीला स्पर्श करून पुजाऱ्यांनी परत दिले तेच कांदे साठे यांनी तेथे यात्रेकरूंच्या संरक्षणासाठी असलेल्या भारतीय लष्करी जवानांसाठी एका जवानाकडे सुपूर्द केले. पहेलगाम ते बाबा अमरनाथ गुहेपर्यंत पाऊस व बर्फ थंडी असा खडतर प्रवास करीत साठे यांनी पाच किलो कांदे घेउन गेले होते सुरक्षारक्षकांनी साठे यांना गुफेत कांदे नेण्यास विरोध केला होता. परंतु साठे यांनी विनंती करत भाविक श्रद्धेप्रमाणे प्रसाद ठेवतात, त्यानुसार माझ्या श्रद्धेप्रमाणे मी शेतात पिकवलेले कांदे प्रसाद म्हणून आणले आहे तेव्हा त्यांनी तपास करून कांदा प्रसाद म्हणून ठेवण्यास परवानगी दिली. याप्रसंगी बाजीराव अभंग, दिलीप घायाळ, श्रीकांत मंडलिक, दिलीप निकम, पवन वाकचौरे, संतोष घायाळ, ज्ञानेश्वर देसले, गणेश जेऊघाले आदी कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. संजय साठे हे प्रयोगशील शेतकरी असून त्यांनी यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची मुंबई येथे भेट घेऊन शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या. त्यांनी विक्री केलेल्या कांदा पट्टीतुन वाहन भाडे ही न फिटल्याने त्यांनी ती १०६४ रुपये रक्कम चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मनिऑर्डर केली होती. त्यानंतरही त्यांनी पंतप्रधान मोदी यांना टोपी उपरणे पाठवून निषेध व्यक्त केला होता.

> वर्षभरापासून कांद्याला भाव नाही, उत्पादन खर्च भेटत नाही, शेतकरी कर्जबाजारी होत आहे शेतकऱ्यांना चांगले पैसे व्हावे यासाठी केंद्र व राज्य सरकारने लक्ष द्यावे, सदबुद्धी द्यावी तसेच अनेक भाविक देवापुढे पेढ्याचा प्रसाद ठेवतात, हार गुच्छ वाहतात. मात्र मी पण माझ्या शेतात रात्रंदिवस कष्ट करून पिकवलेले कांदे सर्व भारतीय कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने बाबा अमरनाथ गुंफेत ठेवून देशासाठी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून सीमेवर पहारा देणाऱ्या जवानांना ते भेट म्हणून दिले आहे.
> **संजय साठे, कांदा उत्पादक शेतकरी**

# किरीट सोमय्यांच्या व्हिडीओची उच्चस्तरीय चौकशी

## देवेंद्र फडणवीस : पावसाळी अधिवेशनात प्रचंड गदारोळ

आधुनिक केसरी न्यूज




किरीट सोमय्या यांच्या आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करण्यात आला होता. या विरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने 'एक हात मदतीचा आपल्या किरीट भाऊला' या अनोख्या आंदोलनाच्या मार्फत निषेध करण्यात आला

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाला असून हा मुद्दा विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही गाजला. या प्रकरणाची सखोल आणि उच्च स्तरावर चौकशी होईल, अशी घोषणा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

फडणवीस म्हणाले की, जो विषय मांडला आहे तो गंभीर आहे. राजकारणात अनेक प्रसंग येत असतात. माझे म्हणणे आहे की माझ्याकडे पुरावे द्या. कोणालाही पाठिशी घालणार नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. कुठलेही प्रकरण दाबले जाणार नाही. विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे सोमय्या यांच्या व्हायरल व्हिडीओचा मुद्दा मांडला. ते म्हणाले की, काही लोक ईडी सीबीआयच्या माध्यमातून विरोधी पक्षांतील नेत्यांना भीती दाखवतात आणि दुसरीकडे आपल्या केंद्रीय यंत्रणेत ओळखी असून महिलांशी संपर्क करत असल्याचे समोर आले आहे. महामंडळात नियुक्त्या देतो, विधानपरिषदेवर घेतो असे सांगितले जाते आणि एक्स्टॉर्शन केले जाते. असेच अनेक नेत्यांना देखील ईडी, सीबीआयचे धाक दाखवून पैसै मागितले जातात. अनेक महिलांनी मला येऊन माहिती दिली आहे. 8 तासांचे व्हिडीओ माझ्याकडे आहेत. असे उपरे दलाल महाराष्ट्रात येतात आणि महिलांना त्रास देतात. किरीट सोमय्या त्यांचे नाव आहे. माता भगिनींना त्रास देणाऱ्या किरीट सोमय्यांना सरकार सुरक्षा देणार का? मी त्याचा पेन ड्राईव्ह आपल्याला देतो. हा माणूस पुन्हा मुंबई पोलिसांना पत्र लिहितो आणि चौकशी करा म्हणतो. दरम्यान राज्यभरात किरीट सोमय्याविरुद्ध आंदोलन करण्यात आले.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वदेशीची जादू

आधुनिक केसरी

पण कोरोनाचे संकट आले आणि अनेक कंपन्यांनी यात आघाडी घेवून ते बनवायला सुरुवात केली. मग भारतानेच अनेक देशांना व्हेंटिलेटर पुरवले. त्याच पद्धतीने कोरोना लशींवर भारतीय वैद्यकीय संस्थांनी संशोधन करून विक्रमी वेळेत लशी तयार केल्या. यापूर्वी मिसाईल मॅन आणि आपले माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली आपण स्वदेशीचा वापर करून अण्वस्त्रे तयार केली. आज आपण अनेक उपग्रह, चांद्रयान बनवतो आहे, त्यांचे प्रक्षेपण करतो आहोत. या सगळ्या गोष्टी अभिमान वाटावा अशा निश्चितच आहेत. पण आमच्या आचार विचारात, जगण्यात स्वदेशी आले आहे का ? आमच्या जगण्याचा तो एक भाग झाला आहे का या प्रश्नाचे उत्तर निश्चितच नकारार्थी द्यावे लागेल. राज कपूरच्या ' श्री ४२० ' या चित्रपटात एक गाणे आहे. ' मेरा जुता हैं जपानी, ये पतलून इंग्लीस्तानी, सरपे लाल टोपी रुसी, फिर भी दिल हैं हिंदुस्तानी ' असे गाणे आहे. त्यात त्याच्या वापराच्या सगळ्या वस्तू जरी विदेशी असल्या तरी मन मात्र हिंदुस्तानी आहे. पण यात आता बदल व्हायला हवा. केवळ ' दिलच हिंदुस्तानी ' असून भागणार नाही, तर वापरातील सर्वच वस्तू स्वदेशी असायला हव्यात. कदाचित आपल्याला माझे म्हणणे पटणार नाही, कोणाला माझा सूर नकारार्थी वाटेल तर अजून कोणी म्हणेल की असे काय आहे त्यात, ज्याबद्दल तुम्ही सांगताय ? पण ज्यावेळी मला काय म्हणायचे आहे हे आपण समजून घेऊ तेव्हा आपल्याला माझे म्हणणे पटेल. तोपर्यंत स्वदेशीची जादू कळणार नाही. आमच्या आहारातील खाद्यपदार्थ, आमची पेये, आमच्या वनस्पती, झाडे, वृक्ष, वेली, आम्ही घेत असलेली पिके, वापरत असलेली खते, कीटकनाशके, आमचा आयुर्वेद,आमचा योग या सगळ्या गोष्टी प्रामुख्याने स्वदेशी हव्यात. कशासाठी ? या सगळ्या गोष्टी आमचे जीवन समृद्ध आणि आरोग्यसंपन्न करणाऱ्या आहेत. आपण सुरुवात खाद्यपदार्थांपासून करू. एकदा मी आणि माझे कुटुंबीय एका मोठ्या हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलो होतो. त्या हॉटेलमध्ये पिझ्झापासून ते थालीपीठापर्यंत सर्व पदार्थ उपलब्ध होते. मला तिथले थालीपीठ खाण्याची इच्छा होती. तिथे आलेली तरुणाई मात्र पिझ्झावर ताव मारत होती. आणखी एका हॉटेलमध्ये आम्ही गेलो होतो, तिथे विविध प्रकारचे बर्गर्स उपलब्ध होते आणि त्या सोबत पिण्यासाठी पाणी नव्हते तर तिथे दिले जाणारे कोल्ड ड्रिंक घ्यायचे होते. या सगळ्या प्रकारांनी मी विचारात पडलो. हे सगळे पदार्थ कितपत आरोग्यदायी आहेत, यावर माहिती घेऊ लागलो. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, फ्राईज, पॅटिस, पेस्ट्री, कुकीज, मोमोज, चाऊमिन यासारख्या पदार्थांना फास्ट फूड किंवा जंक फूड असे नाव आहे. यातील बरेचसे पदार्थ मैद्यापासून बनलेले असतात. पाव, बिस्कीट आदी सगळे बेकरी प्रॉडक्ट्स सुद्धा मैद्यापासूनच बनतात. मैदा हा पोटाच्या तक्रारी वाढवणारा आणि अजिबात फायबर नसलेला पदार्थ आहे.





## आनंदी पहाट

# साधनाला साध्य करताना स्वाधीन होऊ नये

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या दैनंदिन मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी अर्थाजन अनिवार्य असतं. त्या अनुषंगानं प्रत्येकाच्या जीवनांत दोन बाबी अधिकच महत्वाच्या ठरतात, एक म्हणजे शिक्षण अर्थात करिअर आणि व्यवसाय. करिअर निवड ही अर्थार्जनाच्या दृष्टीकोनातून निश्चितच महत्वाची ठरत असते. करिअरची निवड करताना सामजिक भान राखणं देखील महत्वाचं असतं. केवळ अर्थार्जन हा एकमेव उद्देश विचारांत घेणं योग्य ठरत नाही. अर्थार्जनासाठी कोणकोणते मार्ग अवलंबिले पाहिजेत, हे पाहणेही जरुरीचं असतं. सद्यःस्थितीत योग्य मार्गानं पैसे मिळवण्याचा

प्रयत्न करण्यापेक्षा कमी कष्टांत, कमी वेळेत झटपट श्रीमंत कसं होता येईल, ह्याच दृष्टीकोनातून विचार, वर्तन आणि व्यवहार अनेकांकडून होत असल्याचं दिसून येतं. पैसा हे साधन असल्याची जाणीव होणं जरुरीचं असतं. परंतू तो साधन न राहता साध्य होऊ लागतं तेव्हा त्या साधनाच्या आधीन, कालांतरानं स्वाधीन होण्यास प्रारंभ होतो. त्या साधन प्राप्तीसाठी सर्वस्व विसरून जाऊन स्वतःला देखील त्या साधनांच्या स्वाधीन केलं जात असल्याचं विदारक चित्र अनेकदा बघायला मिळत असतं. सुरुवातीला आधीन होणारा तर काहीवेळा लाचार झालेला देखील दिसून येत असतो. त्याच्यासाठी पैसा हे साधन न राहता ते साध्य ठरू लागतं. त्याच्यापुढे आधीन होणं ही आपल्यातील उणिव असू शकते, ह्याची देखील जाणीव अशांना होऊ शकत नसते. स्वाधीन होणारी व्यक्ती इतकी गाफील असते, कि त्या व्यक्तीला पैशाची लालसा निर्माण

झाल्याचीही जाणीव होत नसते. आधीन होणारी व्यक्ती मुळातच अधीर झालेली असल्याचं स्पष्ट होत असतं. आपल्याला जे साध्य करायचं आहे, ते कधी एकदा आपल्याला प्राप्त होतंय, असं झालेलं असतं.



आधुनिक केसरी

**भक्तीचा जिव्हाळा | अनुपम्य ||**
आनंदी सरिता | आनंदी सागर ||
तृप्त चराचर | वैष्णवांचे ||१||
मांगल्याचा टाळ | चैतन्य चिपळी ||
ब्रह्मानंदी टाळी | वारीमध्ये ||
नामाचा गजर | आत्म्याचा जागर ||
देहाचा विसर | संतासंगे ||२||
माय ज्ञानेश्वरी | गाथा आम्हा बाप ||
संसाराचा ताप | दूर झाला ||३||
निरागस बाळ | रांगे वाळवंटी ||
घेई जगजेठी | हृदयाशी ||४||
आनंदाचे भेटी | आनंदी सोहळा ||
भक्तीचा जिव्हाळा | अनुपम्य ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**यद्यत् पश्यामि तत्तद्धि रूपं च तव रेणुके |
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ४६ ||
मी जे काही पाहतो, ते तुझेच रूप
मला दिसो. तुला दुर्गा देवीला मी
अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ज्ञान वृधि ज्यों ज्यों चले,
प्रेम बढ़त त्यों जाय ।
तत्त्वज्ञान के अग्र में, पूर्ण प्रेम दृढ़ आय
।।२२।।(स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय)
०५/०४/२२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जसजशी ज्ञानवृद्धि होते तसतसे प्रेम
वाढत जाते आणि तत्वज्ञानाच्या
पूर्णत्वानंतर दृढ प्रेम निर्माण होतं.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

प्रज्ञावंत म्हणजे बुध्दिमान जो खरा श्रध्दावंत आहे त्याला साधनेचे कष्ट फार पडत नाहीत. जे भोळेभाबडे श्रद्धावान असतात अशांना सन्मानाचा मार्ग सापडतो त्यांच्या अंतर्यामी विवेकशक्ति जागी होऊन सद्वर्तन घडते.सद्गुरू म्हणजे आत्मशक्ति निर्माण करणारे चालतेबोलते यंत्र होय. म्हणून सतत सद्विचार, सदानंद, सत्शील, क्षमाशील असावे. कुरघोडी करून काहीच साध्य होत नाही .सतत विवेकाची कास धरून मिळालेल्या मनुष्य जातीचे सोने करावे. मित्रांनो, या समासात 11 व्या ओवीत तर समर्थ म्हणतात की "माणसापेक्षा दगड बरा." का बरं असं म्हणत असतील समर्थ ? तर त्याचं ऊत्तर ही तुम्हाला मिळेल. माणसाला त्याचा अवगुण, किंवा दोष समजावून सांगितला तर तो तेवढ्याच पुरता आपली चूक मान्य करतो पण परत त्याला वागायचे तसेच वागतो. म्हणजेच जर आपल्यातले दोषगुण घालवायचेच नसतील तर माणसापेक्षा पाषाण बरा म्हणायची वेळ येते. एखाद्याला त्याची वाईट वर्तणुक दाखवून दिली. त्या वाईट वर्तणुकीचे हजारो तोटे दाखवून दिले तरी जो समोरच्याची बाजू समजून घेत नाही तेव्हा आपण म्हणतो की "दगडाला पाझर फुटेल पण याला बिलकुल पाझर फुटणार नाही. पाषाणाची विविध रूपे *
माणिक,मोती,प्रवाळ,पाचु,वैडूर्य,वज्रनील,गोमेदमणी परिस ही सर्व दगडाचीच रूपे आहेत. तर औषधी गुणधर्म असलेले मणी देखील दगडाचीच रूपे आहेत. सुर्यकांत, सोमकांत आणि अनेक रोगांवर औषध म्हणून वापरले जाणारे प्रकार दगडाचेच आहेत.

# गुरु सांगेल तेच साधन

आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा.



खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी.
आजचे बोधवचन आहे . **१९६. हृदयी ठेवा राम ।मुखी सदा त्याचे नाम ।हातात असावे प्रपंचाचे काम ।हेच खरे परमार्थाचे मर्म ॥श्रीराम समर्थ**

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**व्यवहारात सुद्धा आपल्याल गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? पंढरपूरला जायचे असेल तर वाट चालू लागले पाहिजे. मग वाटेत कुणीतरी वाट दाखवणारा भेटतोच; निदान पाट्या तरी आढळतात. . जिथे दोन वाटा फुटतात तिथे एक पंढरपूरची आणि एक गोंदवल्याची पाटी असते, तसे साधनात राहून, जिथे त्या दोन वाटा फुटतात, तिथ पर्यंत या म्हणजे तिथे गुरू उभाच आहे. पण उगीच काही न करता 'पुढे काय आहे ?' हे विचारण्याने काय होणार. प्रपंचात सुखदुःख झाले, सामाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. आता हे पहा रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ 'गाडी माझी आहे' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही. क्रमशः**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**नरः सर्वमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ।
आत्मनो विल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ॥
स्पष्टीकरण - माणूस दुसऱ्याचे बारीक सारीकही दोष पाहून त्यांच्यावर टीका करतो. पण त्याला आपल्या अंगीही काही दोष असू शकतील, असे मात्र कधीच वाटत नाही. या बाबतीत तुकोबांची एक उक्ती लक्षात घ्यायला हवी- "कासया गुणदोष वानूं आणिकांचे ।मज काय त्यांचे उणे असे ॥"स्वतःचे दोष स्वतः पाहायला शिकणे आणि जे दिसतील ते दूर करण्याचा प्रयत्न करणे, हाच उन्नतीचा मार्ग आहे.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १९ जुलै २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# दुसऱ्याचे वस्त्रहरण करणाऱ्याचेच झाले वस्त्रहरण

## नाना पटोले : सीबीआय, ईडीची भीती दाखवून लोकांना ब्लॅकमेल करण्याचे भाजपाचे कारस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपाने मागील ९ वर्षात महाराष्ट्राला कलंक लावण्याचे पाप केले आहे. भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्याबद्दलचा जो आक्षेपार्ह व्हिडिओ एका खाजगी वृत्तवाहिनीने दाखवलेला आहे, तो बघितल्यानंतरच या विषयावर जास्त बोलणे योग्य होईल. परंतु दुसऱ्याचे वस्त्रहरण करनाऱ्याचेच आज वस्त्रहरण झाले आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.
किरीट सोमय्या यांच्या संदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, २०१४ पासून राज्यात सीबीआय, ईडी. आयकर विभाग यासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांची भिती दाखवून ब्लॅकमेल करण्याचे वातावरण सुरु आहे. भाजपाने, कुठे नेऊन ठेवला आहे महाराष्ट्र माझा ? असा परिस्थिती झाली आहे. जी व्यक्ती दुसऱ्यांचे वस्त्रहरण करत होती त्याच व्यक्तीचे आता वस्त्रहरण झालेले आहे. या मुद्दा काँग्रेस पक्षासाठी महत्वाचा नाही तर काँग्रेससाठी जनतेचे प्रश्न महत्वाचे आहेत. महागाई, शेतकरी, महिला, कायदा सुव्यवस्था, तरुणांचे प्रश्न आहेत. महागाई गगनाला भिडली आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, सरकार विधानसभेत घोषणा करते पण मदत मात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही, हे प्रश्न मार्गी लावण्याचे काम काँग्रेस पक्षासाठी महत्वाचे आहे.
बेरोजगारीचा प्रश्न मोठा गंभीर आहे, सरकारी नोकर भरती करण्यात राज्य सरकार टाळाटाळ करत आहे. राज्यात ५० ते ६० हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत परंतु ती भरली जात नाहीत आणि निवृत्त शिक्षकांना मानधनावर घेण्याचा अफलातून शासन आदेश जारी केलेला आहे. हा शासन आदेश शिक्षक होऊ पाहणाऱ्या तरुण-तरुणींचा घोर अपमान करणारा आहे. या शासन आदेशाविरोधात पुण्यात बेरोजगार तरुण आंदोलनही करत आहेत. सरकारने या प्रश्नात लक्ष घालून तरुणांना न्याय दिला पाहिजे असेही पटोले म्हणाले.



## धानोरे येथील जवान श्रीराम गुजर हजारोंच्या उपस्थितीत अनंतात विलीन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भारतीय सैन्यदलातील सुट्टीवर आलेला जवान श्रीराम राजेंद्र गुजर वय-२४ यांच्यावर धानोरे ता.निफाड येथे आज मंगळवार दि.१८ जुलै रोजी शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

श्रीराम हे भारतीय सैन्यदलात आसाम, गुवाहाटी येथे बॉम्बे इंजिनिअर कोर २३६ IET युनिट मध्ये गेल्या सात वर्षांपासून जहाज ऑपरेटर म्हणून कर्तव्यावर होते. श्रीराम यांचे अपघातानंतर उपचारादरम्यान सोमवार दि.१७ जुलै रोजी दुर्दैवी निधन झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कुठल्याही प्रकारचे आदेश आलेले नसल्याने देवळाली कॅम्प येथील आर्टिलरी सेंटरचे सुभेदार टी.क्रिस्टोपर यांच्या तुकडीने व पंचक्रोशीतील माजी सैनिक, लासलगाव पोलिसांनी त्यांना अखेरची मानवंदना दिली. यावेळी फुलांनी सजविलेल्या सैन्यदलाच्या रथातून श्रीराम यांची घरापासून व गावातून अंत्ययात्रा काढण्यात आली. अंत्ययात्रेत हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. 'ए मेरे वतन के लोगो' या गीताची धून व 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'श्रीराम भैय्या, अमर रहे' या घोषणा देत उपस्थित जनसागराने साश्रु नयनांनी श्रीराम यांना अखेरचा निरोप दिला. जवान श्रीराम यांचे आजोबा संतु गुजर, वडील राजेंद्र, आई अनिता, भाऊ नितिन, बहीण प्रियंका सह नातेवाईकांचा आक्रोश पाहून उपस्थित जनसमुदायाचे मन हेलावले.यावेळी भाऊ नितीन याने अग्निडाग दिला. याप्रसंगी देवळाली कॅम्प सिक्स फिल्ड रेजिमेंटचे सुभेदार टी क्रिस्टोपर, नायब सुभेदार मस्के, उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, तहसीलदार शरद घोरपडे, लासलगाव स.पो.नि.राहुल वाघ, मंडळ अधिकारी संतोष डुंबरे, मालेगावचे पोलिस निरीक्षक दौलत जाधव, बाळासाहेब पगारे, त्रिदल सैनिक संघ निफाड ता.अध्यक्ष तुषार खरात, कॅप्टन मार्तंड दाभाडे, मा.पं.स.समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, राष्ट्रवादीचे शाहू शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश पाटील, बाबासाहेब गुजर, पो.पाटील अरुण गुजर, योगेश झुरळे, केदारनाथ तासकर, अंकुश तासकर आदींसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुलाचे स्मारक व्हावे ही वडिलांची इच्छा ..**
मुलाची देशसेवेची इच्छा अकाली निधनामुळे अपूर्ण राहिली असली तरी तो नक्कीच सर्व देशवाशियांच्या स्मरणात राहील . त्यामुळे त्याचे स्मारक व्हावे यासाठी वडील राजेंद्र यांनी प्रांत हेमांगी पाटील, तहसीलदार शरद घोरपडे व लासलगावचे स .पो .नि .राहुल वाघ यांची अक्षरश : विनवणी केली . स्मारकाबाबत यथोचित मदत केली जाईल असे संबंधितांनी आश्वासन दिले .

## नायब तहसीलदाराच्या आशीर्वादानेच होतोय स्वस्त धान्याचा काळाबाजार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** तालुक्यातील पूरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने स्वस्त धान्य गोदामात मोठ्या प्रमाणात काळाबाजार सुरु असल्याची कुणकुण दैनिक आधुनिक केसरीला अगोदरच लागली होती.या अनुषंगाने दोन बातम्याही प्रसिद्ध केल्या होत्या मात्र झोपेचे सोंग घेतलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सोंगामुळे हे बिनधास्त चालू होते.या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आमदार राजेश पवार यांच्या सूचनेनुसार भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष विजय पा. डांगे यांनी सोमवारी ( ता.१७ ) स्वस्त धान्य दुकानाच्या गोदामाला शिष्टमंडळासह अचानक भेट दिली. यामुळे हा काळाबाजार उजेडात आला आहे. अचानक आलेल्या शिष्टमंडळाला बघून नुकतेच रुजू झालेले गोदामपाल नेहरकर यांनी चक्क सर्वांच्या समोरून पळ काढला.
यातील काळबेर बघून नायब तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी पंडित राठोड यांना बोलावून घेतले मात्र त्यांनी अत्यंत बेजबाबदार उडावा - उडवीचे उत्तरे दिली.
अर्थात यासर्व प्रकाराला पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार पंडित राठोड यांच्या आशीर्वादानेच हे सर्व असल्याची शंका शिष्टमंडळाला आली.
ग्राहकांचे जवळपास बारा लक्ष रुपये पुरवठा नायब नायब तहसीलदार पंडित राठोड यांनी उकळले असल्याचाही चर्चा व तक्रारी येत आहेत. मे महिन्यात तर तब्बल नऊ गावात स्वस्तधान्य वाटपच न झाल्याचे धक्कादायक वृत्त असून ५० किलोच्या प्रत्येक धान्याच्या पोत्यामागे दीड ते दोन किलो धान्य कमी येत होते. त्याचा फटका स्वस्त धान्य दुकानदारांना व ग्राहकांना बसत होता. याची खातरजमा करण्यासाठी शिष्टमंडळाने पुरवठा अधिकाऱ्यांच्या समक्ष वजन केले असता पोत्यातील धान्याचे वजन एक ते दीड किलो कमी भरले. धर्माबाद तालुक्यात ५७ स्वस्तधान्य परवानाधारक आहेत.तसेच तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांची संख्या १७४४४आहे.अंत्योदय -२४५५, प्राधान्य योजना - १०८१८ व केसरी -४१७१ आहे. या कार्डधारकासाठी दरमहा हजारो क्विंटल माल गोदामात येतो मात्र पुरवठा विभागाचे तहसीलदार वं गोदामपाल संगनमत करून काळाबाजर करीत आहेत.
या काळाबाजाराला उजेडात आणण्यासाठी विजय पाटील डांगे यांच्यासह ॲड.चक्रेश पाटील, श्रीनिवास पाटील भुतावळे, बालाजी सावरगावे,पत्रकार गंगाधर धडेकर,बालाजी चिंतावार,राजेश्वर होटकर, बालाजी कवडे,मेघनाथ पवार, अरुण साखरे,अवधूत पाटील जाधव,पत्रकार बाबुराव पाटील, बाबुराव गोणारकर,सतीश शिंदे पंडित जाधव,सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर पुरी महाराज यांनी दुपारी दोन वाजता अचानक शासकीय गोदामावर धडकले. ह्या सर्व काळ्याबाजाराची मुळातून चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.



आमदार राजेश पवार यांच्या सूचनेनुसार आम्ही आज याठिकाणी भेट दिली . मात्र मोठा गैरव्यवहार असून पुरवठा विभागासह संबंधित यंत्रणेच्या विरोधात जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करणार आहोत .
**विजय पा . डांगे**
**भाजप, माजी तालुका अध्यक्ष, धर्माबाद**

पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार पंडित राठोड यांना उपस्थितांनी गोदामपाल का पळाले ? हा प्रश्न उपस्थित केले असता गोदामपाल हे 'पागल' असल्याचे अजब उत्तर दिले .

बहुतांशी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना साखरच मिळत नसल्याचे धक्कादायक वृत्त महिन्याकाठी साखरेची विल्हेवाट काळ्या बाजारात लावत असल्याच्याही तक्रार आहेत . या घटनेमुळे आधुनिक केसरीच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाला आहे .

## अपंगांच्या हक्काचा 5 टक्के निधी वाटप करा, अन्यथा तीव्र आंदोलन : प्रहार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात २०२० पासून अपंगांच्या हक्काचा ५% निधी मिळालेला नाही. ग्रापंचायतींना विनंती करून ही हक्काचा ५% निधी प्राप्त होत नाही. तसेच अपंगांना व्यवसाय करण्यासाठी २०० स्क्वेअर फुट जागा तालुक्यातील प्रत्येक ग्रामंचायतीने गावातील आपंगांना द्यावी. या मागणी साठी प्रहार अपंग क्रांती कन्नड यांनी आज कन्नड पंचायत समिती कार्यालय येथे निवेदन सादर केले.

प्रहार अपंग क्रांती कन्नड यांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालय येथे निवेदन सादर केले. या निवेदनात विशेष मागणी करतांना प्रहार अपंग क्रांतीची प्रमुख मागणी त्यांनी या निवेदनात सांगितली आहे की, अपंगांना ५ टक्के निधी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत ने गावातील प्रत्येक अपंगांना द्यावा. तसेच अपंगांना काम करता येत नाही त्यांची उपासमार होऊ नये यासाठी त्यांना २०० स्क्वेअर फूट जागा व्यवसायासाठी देण्यात यावी जेणेकरून अपंगांची उपासमार होणार नाही. यासाठी



प्रहार अपंग क्रांती यांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालय येथे निवेदन सादर केले.

तसेच ही मागणी मान्य न झाल्यास प्रहार अपंग क्रांती, प्रहार जनशक्ती, युवक प्रहार आघाडी, यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल यावेळी सुभाष मिसाळ प्र. अ. क्रां. जि. सरचिटणीस, गणेश नलावडे तालुका अध्यक्ष प्र. अ. क्रां. , युवराज बोरसे पाटील प्रहार सेवक कन्नड, कल्याण शिंदे प्र. अ. क्रां. ता. कार्य अध्यक्ष, सुखदेव मुगले प्र. अ. क्रां. श. प्रमुख, रमेश काचोळे प्र. अ. क्रां. ता.उप अध्यक्ष, रामहरी घुगे प्र. अ. क्रां. उ. ता. अध्यक्ष, कारभारी शनमळे, विकास निकम, सोमनाथ चोथे. व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



# राहुल गांधी यांची याचिका

आधुनिक केसरी

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी 'मोदी' आडनावावरून केलेल्या टिप्पणीवरून सुरत न्यायालयाने मानहानीच्या खटल्यात त्यांना दोषी ठरवले होते. याप्रकरणी राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. कोर्टाच्या निकालानंतर राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. त्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी सुरत न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मानहानीच्या खटल्यातील निर्णयाला स्थगिती देण्याची विनंती करणाऱ्या राहुल गांधींच्या याचिकेवर सरन्यायाधीशी डी. वाय. चंद्रचूड यांच्यासमोर २१ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये कर्नाटक निवडणुकीच्या प्रचारावेळी एका भाषणात 'मोदी' आडनावावरुन टिप्पणी केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विजय माल्या, नीरव मोदी आणि ललित मोदी अशा सगळ्या कर्जबुडव्या उद्योगपतींचा उल्लेख करत 'सगळे चोर मोदीच का असतात' असे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यानंतर गुजरातमधील भाजपा आमदार पूर्णेश मोदी यांनी राहुल गांधींविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला होता. याप्रकरणी राहुल गांधींना दोषी ठरवून त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. तसेच या निकालानंतर राहुल गांधी यांचं लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. तत्पूर्वी, गुजरात उच्च न्यायालयाने दोन आठवड्यांपूर्वी राहुल गांधींच्या शिक्षेला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली होती. उच्च न्यायालयाच्या ७ जुलैच्या या आदेशाला राहुल गांधी यांनी शनिवारी (१५ जुलै) सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यांनी वकील प्रसन्न एस. यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. त्यावर आता २१ जुलै रोजी सुनावणी होईल. या मानहानी प्रकरणात सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोषी ठरवल्यानंतर २४ मार्च २०२३ रोजी राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्यात आली होती. या शिक्षेला स्थगिती द्यावी, अशी याचिका गांधी यांनी गुजरात उच्च न्यायालयात केली. मात्र, 'राजकारणातील पावित्र्य' ही काळाची गरज आहे, असे सांगून उच्च न्यायालयाने ७ जुलैला त्यांची याचिका फेटाळून लावली होती. या आदेशाला राहुल गांधी यांनी आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

# शासकीय संस्था तोट्यात का आहेत ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**पन्नास वर्षांपूर्वी बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे शासनाला लाभदायक वाटले. म्हणून त्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा धडाका लावला होता. मात्र आज विद्यमान सरकारला सर्व शासकीय विभाग, संस्था व क्षेत्रे घाटा करणारे आहेत, असे का वाटू लागले आहे? "तुका म्हणे उगे रहा! जे जे होईल ते ते पहा!!" या संतोक्तीची प्रचिती नक्कीच येऊ लागली आहे, नाही का? एकेक करून शासकीय संस्था व विभाग मागील तीनचार वर्षांपासून बेमुर्त बेमालूमपणे खाजगी कंपन्यांकडे सुपूर्द केले जात आहे. त्यातल्या त्यात आता राष्ट्रीयकृत असलेल्या बँकांची वर्णी लावल्या जाणार असल्याचे ऐकण्यात येत आहे. आपला सुजलाम सुफलाम भारत देश सद्या विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे, की भकास करण्याकडे? गरीबांवर राज्यकर्त्या धुरिणांचा कल आहे, हेच एक सर्वसामान्यांच्या पुढ्यात उभे ठाकलेले न उलगडणारे कोडे आहे, एवढे मात्र खरे!**

सरकारी क्षेत्राचा व्याप हळूहळू वाढत गेल्याचे दिसून आले. सिमेंट, कागद, औषधे, कापड यांसारख्या उपभोग्य वस्तूंची टंचाई भरून काढण्यासाठी त्या क्षेत्रातही सार्वजनिक उद्योग सुरू करण्यात आले. मजूर बेकार होऊ नयेत, म्हणून आजारी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. भांडवली व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करण्याव्यतिरिक्त सरकारी क्षेत्राने सेवाक्षेत्रातही शिरकाव करून घेतल्याचे दिसते. वित्तीय आणि व्यापार क्षेत्रांत सरकारी क्षेत्राचा प्रभाव अधिक आहे. सरकारने सन १९६९ मध्ये १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. तर सन १९८०मध्ये आणखी ६ बँका ताब्यात घेतल्या. जीवनविमा, सर्वसाधारण विमा, विमान वाहतूक, हिंदुस्थान झिंक्स आदी उद्योगांचे सरकारने राष्ट्रीयीकरण केले. उद्योगधंद्यांना दीर्घमुदतीची कर्जे पुरविणाऱ्या वित्तीय संस्था सार्वजनिक मालकीच्या असून भारतीय राज्य व्यापार निगम, खनिज व धातू व्यापार निगम आदी व्यापारी संस्थाही सरकारने स्थापन केल्या आहेत. योजनाबद्ध आर्थिक विकासात सरकारी क्षेत्राची वाढ झपाट्याने होत असून देशाच्या अर्थकारणात त्या क्षेत्रास महत्त्वाचे स्थान आहे. संपूर्ण सरकारी क्षेत्र केंद्र, राज्य आणि स्थानिक या तिन्ही पातळ्यांवरील शासनांच्या मालकीचे असले, तरी केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील उद्योग व सेवा देशाच्या विकासाला गती व दिशा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत. पोलाद, रसायने, खनिजे व धातू, खनिजतेल आदी उद्योग केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. सन १९५०-५१ साली अशा उद्योगांची संख्या अवघी पाच होती. सन १९८४मध्ये ती २१४पर्यंत वाढली. या काळात या क्षेत्रातील गुंतवणूक रुपये २९ कोटींवरून रुपये ३५,४११ कोटींवर गेली. गुंतवणुकीचा ८० टक्के भाग वस्तु-उत्पादनासाठी व उर्वरित २० टक्के भाग सेवा उद्योगांसाठी उपयोगात आणला जातो. आज सरकारी क्षेत्राने अर्थव्यवस्थेची सर्व अंगे व्यापली आहेत. कोळसा, पोलाद, वीज, खते, यंत्रसामग्री यांच्या उत्पादनावर मुख्य भर असला, तरी वाहतूक, दळणवळण, कृत्रिम पाणीपुरवठा, व्यापार, वित्तपुरवठा, प्रवासी वाहतूक आदी बाबतींत सरकारी क्षेत्राने महत्त्वाचा वाटा उचलला आहे. खाजगी उद्योगांच्या वाढीसाठी अंतःसंरचना निर्माण करणे, हे सरकारी क्षेत्राचे आणखी एक उद्दिष्ट आहे. शिक्षण, घरबांधणी, पाणीपुरवठा यांवरील सरकारी खर्च जमेस धरला, तर सरकारी क्षेत्रातील एकूण गुंतवणूक डोळ्यांत भरण्यासारखी आहे.

एखाद्या बँकेची अथवा काही बँकांची मालकी जेव्हा सरकार स्वतःकडे घेते व त्या बँकेचे किंवा बँकांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सरकारकडे येते, त्यास राष्ट्रीयीकरण म्हणतात. तत्पूर्वी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण दि.१ जानेवारी १९४९ रोजी करण्यात आले. तर दि.१ जुलै १९५५ रोजी इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडिया-एसबीआयची निर्मिती करण्यात आली होती. दि.१९ जुलै १९६९ रोजी राष्ट्रपतींच्या वटहुकूमाद्वारे ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँक व्यावसायिकांना या वटहुकूमाला न्यायालयात आव्हान देवून घटना बाह्य ठरविण्यात आले. त्यानंतर दि.१४ फेब्रुवारी १९७०ला नवा वटहुकूम काढण्यात आला. दि.३१ मार्च १९७०ला त्याचे कायद्यात रुपांतर करण्यात येवून पूर्वलक्षी म्हणजेच दि.१९ जुलै १९६९पासून लागू करण्यात आला. ही राष्ट्रीयीकरणाची शिफारस हजारी समितीने केली होती.

राष्ट्रीयीकरण झालेल्या १४ बँका- १.बँक ऑफ इंडिया, २.युनियन बँक ऑफ इंडिया, ३.बँक ऑफ बडोदा, ४.बँक ऑफ महाराष्ट्र, ५.पंजाब नॅशनल बँक, ६.इंडियन बँक, ७.इंडियन ओवरसिज बँक, ८.सेंट्रल बँक ऑफ इंडिया, ९.कॅनरा बँक,१०. सिंडिकेट बँक, ११.युनायटेड कमर्शिअल बँक, १२.अलाहाबाद बँक, १३.युनायटेड बँक ऑफ इंडिया आणि १४.देना बँक या होत. या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर एकूण ८७ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्यात आली. सर्वात जास्त नुकसान भरपाई सेंट्रल बँक ऑफ इंडियास १७.५ कोटी रुपये तर सर्वात कमी नुकसान भरपाई बँक ऑफ महाराष्ट्र व इंडियन बँक यांना प्रत्येकी २.३ कोटी रुपये देण्यात आले. राष्ट्रीयीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात दि.१५ एप्रिल १९८० रोजी ज्या बँकांच्या ठेवी २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक होत्या अशा सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्या बँका अशा- आंध्र बँक, विजया बँक, कॉर्पोरेशन बँक, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब ॲन्ड सिंध बँक आणि न्यु बँक ऑफ इंडिया. सन १९८०मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या ६ बँकांपैकी एक असलेली न्यु बँक ऑफ इंडियाचे १९९३ला पंजाब नॅशनल बँकेत विलीनीकरण करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकाची संख्या २७ इतकी झाली. बन २००५मध्ये आयडीबीआय बँक लिमीटेड ही सार्वजनिक क्षेत्रातील २८ वी बँक ठरली होती. परंतु स्टेट ऑफ सौराष्ट्राचे स्टेट बँकेमध्ये विलिनीकरण झाल्याने राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या पुन्हा २७ झाली.



THE TIMES OF INDIA

BOMBAY: SUNDAY, JULY 20, 1969

14 TOP BANKS ARE NATIONALISED

Ordinance follows unanimous Cabinet decision

"The Times of India" News Service

WITHIN an hour of the formal exit of Mr. Morarji Desai from the Union Government, the Cabinet today decided to nationalise 14 major commercial banks, thus providing an immediate economic justification for the Prime Minister's political decisions taken during the week.

Nationalised banks

A vital step, says Indira

Nanda called to Delhi

Kamaraj, Chavan happy

'Syndicate' in disarray as Morarji goes

Assam flood worsens: heavy havoc

Emergency meeting

Tarun Chandel (http://photos.tarunchandel.com)

पन्नास वर्षांपूर्वी बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे शासनाला लाभदायक वाटले. म्हणून त्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा धडाका लावला होता. मात्र आज विद्यमान सरकारला सर्व शासकीय विभाग, संस्था व क्षेत्रे घाटा करणारे आहेत, असे का वाटू लागले आहे ? "तुका म्हणे उगे रहा! जे जे होईल ते ते पहा!!" या संतोक्तीची प्रचिती नक्कीच येऊ लागली आहे, नाही का ? एकेक करून शासकीय संस्था व विभाग मागील तीनचार वर्षांपासून बेमुर्त बेमालूमपणे खाजगी कंपन्यांकडे सुपूर्द केले जात आहे. त्यातल्या त्यात आता राष्ट्रीयकृत असलेल्या बँकांची वर्णी लावल्या जाणार असल्याचे ऐकण्यात येत आहे. आपला सुजलाम सुफलाम भारत देश सद्या विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे, की भकास करण्याकडे गरीबांवर राज्यकर्त्या धुरिणांचा कल आहे, हेच एक सर्वसामान्यांच्या पुढ्यात उभे ठाकलेले न उलगडणारे कोडे आहे, एवढे मात्र खरे!

# जगात उपासमारीची गंभीर समस्या



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**आज रोजी भूक ही जगातील प्रमुख समस्या असून, संपूर्ण जगाला भुकेच्या भीतीने ग्रासले आहे. जागतिक ते स्थानिक अन्न प्रणालीतील अतिव्यापी संकटातून जगभरातील लोकसंख्येची भुकेची पातळी गंभीर असल्याचे जगात दिसुन येते. अन्नाविना उपासमार होणा-यांच्या संख्येत झपाट्याने वाढत आहे. जगात सुमारे ७४ कोटी लोक उपासमारीचे बळी असल्याचे यूएनच्या नवीन अहवालात समोर आले आहे. म्हणजेच त्यांना अन्न अजिबात मिळाले नाही. यूएनच्या द स्टेट ऑफ फूड सिक्युरिटी अँड न्यूट्रिशन इन द वर्ल्ड २०२२ रिपोर्ट' नुसार, २०१९ नंतर लोकांचा भुकेशी संघर्ष झपाट्याने वाढला आहे. २०१९ मध्ये, जगातील ६१८ दशलक्ष (६१.८ कोटी) लोकांना उपासमारीचा सामना करावा लागला. म्हणजेच केवळ ३ वर्षात एक वेळचे अन्न मिळत नाही, असे १२.२ कोटी लोक वाढले आहेत.**

अहवालात असेही म्हटले आहे की, गेल्या वर्षी म्हणजेच २०२२ मध्ये जगातील ११.३% लोकसंख्येला (सुमारे ९० कोटी लोकांना) पुरेसे अन्न मिळाले नाही. अहवालानुसार, उपासमारीची स्थिती अशीच राहिली तर २०३० पर्यंत ६०० दशलक्ष (६० कोटी) लोक कुपोषणाचे बळी होतील. जगात दर तीनपैकी एका व्यक्तीला रिकाम्या पोटी झोपण्याची वेळ आली आहे. सोप्या शब्दांत सांगायचे तर, २४० कोटी लोकांना किंवा जगाच्या लोकसंख्येच्या २९.६% लोकांना अन्नाचा पुरवठा होऊ शकत नाही. याशिवाय २०२१ मध्ये जगातील ३१० कोटी लोकांना म्हणजेच ४२ % लोकसंख्येला पोषक आहार मिळालेला नाही. भूक ही खाण्यासाठी पुरेसे अन्न उपलब्ध असण्यापेक्षा ते पौष्टिक असण्याबद्दल आहे. पाच वर्षाखालील मुलांचे मृत्यू दर ४५ टक्के हे अपुऱ्या अन्नामुळे नाहीतर अयोग्य पोषणामुळे होते. २०२२ मध्ये ५ वर्षाखालील ४.५ कोटी मुले कुपोषणाचे बळी ठरले. त्याचवेळी १४.८ कोटी मुलांची वाढ आणि विकास कमी प्रमाणात झाला. ही मुले अतिशय बारीक आणि अशक्त झाली आहेत. या मुलांचे वजन त्यांच्या वयानुसार कमी आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे आंतरराष्ट्रीय चलनवाढ वाढली आहे. त्यामुळे लोकांना दैनंदिन वस्तू खरेदी करता येत नाही. खरे तर, रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश गहू, सूर्यफूल तेल आणि खतांपासून कृषी उत्पादनांचे प्रमुख निर्यातदार आहेत. युद्ध सुरू झाल्यापासून जागतिक पुरवठा साखळी प्रभावित झाली आहे. युक्रेनमधील युद्धाने व्यापार, उत्पादन आणि उपभोगाचे जागतिक नमुने बदलले आहेत. ज्यामुळे २०२४ पर्यंत चलनवाढीने किमती उच्च राहिल्याने अन्न असुरक्षितता वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ज्याची सर्वाधिक झळ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांतील लोकांना भूक बळी आणि कुपोषणाच्या माध्यमातून सोसावी लागणार आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार २०३० पर्यंत जगातील उपासमार शून्यावर आणण्याच्या उद्दिष्टाजवळ पोहोचणे जवळपास अशक्य असल्याचे दिसत आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे अन्नपुरवठा साखळी विस्कळीत झाली होती. ज्या मुलांना आणि प्रौढांना त्यांच्या आयुष्यात कधीतरी कुपोषणाचा इतिहास होता त्यांना संसर्ग झाल्यास मृत्यूचा धोका जास्त असतो. कुपोषणामुळे रोगांशी लढण्याच्या प्रतिकारशक्तीच्या क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. अन्नाचा अधिकार हा मानवी मूलभूत अधिकांपैकी एक आहे. पृथ्वीवर ७ अब्जाहून अधिक लोकांना पुरेल इतके अन्न उत्पन्न होत असले तरीही त्याचे असमानता आणि आर्थिक विषमतेमुळे असंतुलित वितरण होते. जगभरात उत्पादक केलेल्या अन्नांपैकी एक तृतीयांश अन्न वाया जाते. त्यामुळे इतर आजारांपेक्षा उपासमारीने लोकांचा मृत्यू दर जास्त आहे.सध्याची जगाची ७.९ अब्ज लोकसंख्या २०५० पर्यंत १० अब्जापर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. सातत्याने वाढणारी लोकसंख्या, उत्पन्नातील सुधारणा आणि हारातील वैविध्य यामुळे अन्नाची मागणी सातत्याने वाढते आहे. जगभरातून विविध प्रदेशांमध्ये आणि देशांतर्गत पातळीवर अनेक उपाययोजना केल्यानंतरही भुकेच्या समस्येचा पूर्णपणे निपटारा होऊ शकलेला नाही. याउलट उपासमार आणि कुपोषणाचे दुष्टचक्र अधिकच उग्र स्वरूप धारण करू पाहतेय. आज जागतिक ते स्थानिक अन्न प्रणालीला वाढती गरिबी, असमानता, अकार्यक्षम प्रशासन व्यवस्था, भ्रष्टाचार, सुमार पायाभूत सुविधा, आणि अल्प कृषी उत्पादकता या संकटातून हानी पोहोचतेय. जगभरातील भुकेचे पोषण करायचे असेल तर जागतिक अन्न उत्पादन पद्धतीमध्ये सुधार करणे आवश्यक आहे. शाश्वत कृषी पद्धती आणि नवीन तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करणे अपरिहार्य आहे. शेतीची पर्यायाने अन्नसुरक्षेची शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक सहयोग व विकास संघटनेने सुचित्त केल्याप्रमाणे शेतीसाठी पाणी, हवा आणि जैवविविधता संवर्धनासाठी किफायतशीर कृषी-पर्यावरण धोरणांचा फेरविचार महत्त्वाचा ठरेल. आपण अन्न कसे वापरतो, सामायिक करतो आणि वाढ करतो ह्यावर पुनर्विचार करणे गरजेचे आहे. नीट व्यवस्थापन केल्यास शेतीतून, मत्स्य उत्पादनातून पुरेसे पौष्टिक अन्न पुरवू शकतो. सध्याच्या अन्न व्यवस्थेत अजूनही दरवर्षी सुमारे एक तृतीयांश जागतिक अन्नधान्याची नासाडी होतेय, जे जवळपास १.२ अब्ज टन अन्नाच्या समतुल्य आहे. संशोधन असे सूचित करते, की जर उच्च उत्पन्न असलेल्या देशांनी काढणीपश्चात होणारे नुकसान पन्नास टक्क्यांनी कमी केले तर गरीब देशांमधील कुपोषित लोकांची संख्या ६३ दशलक्षांपर्यंत कमी होऊ शकते. तसेच उरलेलं अन्न कंपोस्ट करणे यासारखी छोट्या प्रक्रियेसाठी पावले उचलू शकतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भीमनगरच्या महिलांचा पालिकेवर धडकला मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या सात ते आठ वर्षापासून साक्री रोड येथील भीम नगर परिसरात नागरिक सोयी सुविधापासून वंचित असून व अचानक सार्वजनिक शौचालय बंद केल्यामुळे गोरगरीब नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने महिला मोर्चा काढण्यात आला व पालिका अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. धुळे शहरात काही अधिकाऱ्यांनी महानगरपालिका सार्वजनिक स्वच्छालय अचानक बंद केल्याचे आदेश देऊन नागरिकांची यात गैरसोय होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून ही देखील मोठी गैरसोय होत आहे. पावसाळा येण्याआधी नालेसफाईसाठी अनेकदा निवेदन देऊन देखील नालेसफाई झाली नाही. अनेक वर्षांपासून नगर सेवक वार्डात फेरी सुद्धा मारत नाही नागरिकांच्या समस्या मनावर घेत नाही असे या निवेदनात म्हटले आहे. अतिरिक्त आयुक्त सनेर यांनी निवेदन स्वीकार करून काही अटी शर्ती टाकून नागरिकांच्या समस्या सोडू असे आश्वासन दिले. सनेर यांनी सांगितले की आम्ही तुम्हाला एक महिन्याची मुदत देऊ तोपर्यंत तुम्ही शासन योजनेचा लाभ घेऊन त्वरित स्वच्छालय बांधा असे आवाहन केले. काही नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले की शासन योजनेत स्वच्छालय बांधण्यासाठी 16 हजार रुपये मिळतात एवढ्या कमी निधीतून स्वच्छालय बांधले जात नाही यावर सनेर यांनी सांगितले की तुम्ही योजनेचा फॉर्म भरा बाकी सर्व कामे आम्ही करून देऊ. नागरिकांनी या गोष्टी मान्य करून मोर्चा स्थगित करण्यात आला. या ठिकाणी उपस्थित पूनम शिरसाट,सीमा बागुल, ज्योती खैरनार, उषा भालेराव, कल्पना बागले, अनिता फुलपगारे, सोनी सोनवणे, मनीषा सोनवणे, सुवर्णा निकम, श्वेता शेजवळ, सरला सोनवणे, मीनल पवार, कमल मोरे, वैशाली अडकमोल, प्रतिभा खाटीक, मनीषा बैसाणे, निलाबाई शिरसागर, उषाबाई सय्यद व इतर महिला उपस्थित होते.




# अजिंठा लेणी सुटीमुळे  हाऊसफुल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथील जगप्रसिद्ध अजिंठा लेणी सुंदर नैसर्गिक हे निसर्गसौंदर्य पर्यटकांना आकर्षित करत असल्याचे दिसते. सगळीकडे पावसाच्या थेंबासह हिरवेगार दृश्य, डोंगराच्या उंचीवरून वाहणारा धबधबा. डोंगरात कोरलेल्या लेण्या, हे नयनरम्य दृश्य पाहण्यासाठी देशी-विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. रविवारी ३७२८ पर्यटकांनी जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांचा आनंद लुटला. पर्यटकांच्या गर्दीमुळे एसटी महामंडळ, पर्यटन महामंडळ आणि भारतीय पुरातत्व विभागाला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. पर्यटकांच्या गर्दीमुळे फर्दापूर टी पॉइंट येथील पर्यटन महामंडळाचे पार्किंग फुल्ल झाले होते.रविवार, १६ /७/२३ रोजी पर्यटकांच्या गर्दीमुळे पर्यटक फर्दापूर टी पॉइंटवर बसच्या तिकिटासाठी ५०० मीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सोयगाव आगारात बसेसची कमतरता असल्याने याठिकाणी लांबच लांब रांगा लागल्याने देशी-विदेशी पर्यटक एसटी महामंडळावर नाराज असल्याचे दिसून आले. सोयगावच्या आगार व्यवस्थापकानी दुपहरी बसेसची संख्या व कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली.शाळकरी मुलांमध्ये नाराजी फर्दापूर टी पॉइंट ते अजिंठा लेणीपर्यंत फक्त एसटी महामंडळाच्या बसेस धावतात. मात्र या बसेसमध्येही ५ वर्षांच्या मुलांकडून पूर्ण भाडे आकारले जात आहे, जे अत्यंत चुकीचे आहे. तर दुसरीकडे बसमध्ये मुलांकडून निम्मे भाडे आकारले जाते. मग अजिंठा लेणीत असे का असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला.कड़ी सुरक्षा व्यवस्था

पर्यटकांच्या गर्दीमुळे फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर टी पॉइंट, अजिंठा लेणी येथे उपनिरीक्षक नीलेश लोखंडे, पु. को भारत कोळी, विनोद कोळी, योगेश कोळी, तड़वी यासह इतरांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय आणि सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथे इ. दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.
यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय साईनाथ पाटील जाधव साहेब हे होते तर, प्रमुख अतिथी म्हणून खुलताबाद तालुक्याचे  तहसीलदार माननीय श्री. स्वरूप कंकाळ साहेब, डॉ.श्री सतीश सातव सर ( अधिव्याख्याता ) प्रादेशिक विद्या प्राधिकरण औरंगाबाद, बागले सर, संस्थेचे पदाधिकारी द्वारकादास पाटील जाधव, कारभारी पाटील जाधव( माजी तालुकाध्यक्ष शिवसेना ) श्री.अंबादास  दळे, श्री मच्छिंद्र पाटील जाधव हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. इयत्ता 11वी च्या विद्यार्थिनी स्वागत गीत म्हटले.  सत्कार समारंभ- श्री कंकाळ साहेब व  डॉ.श्री सतीश सातव सर यांचे स्वागत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले.मच्छिंद्र पाटील जाधव याचे स्वागत खैरनार सर यांनी केले.संस्थेचे पदाधिकारी श्री. द्वारकादास पाटील जाधव यांचे स्वागत प्रशासकीय अधिकारी प्रा. संदिप जाधव सर यांनी केले.श्री कारभारी पाटील जाधव यांचे स्वागत प्रा.तुकाराम जाधव सर यांनी केले. प्रा. श्री.बागले सर व श्री. अंबादास दळे यांचे स्वागत प्रा. अमोल जाधव सर यांचे यांनी केले.  कार्यक्रमाचे



प्रास्ताविक कार्यक्रमाचे अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले.यानंतर दहावी व बारावी ( कला व विज्ञान )शाखेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रशस्तिपत्र , एक पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन  उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करणाऱ्या गुणवंत  विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव यांनी बक्षीसपर धनादेश देण्यात आले.  डॉ. सातव सर यानी विद्यार्थ्यांना  मोलाचे  मार्गदर्शन केले. विविध क्षेत्रातील संधी याबद्दल माहीती दिली. खुलताबाद तालुक्याचे माननीय तहसीलदार श्री.कंकाळे साहेब यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील तयारी ,योग्य नियोजन,  तणाव न घेता सकारात्मक मानसिकतेतून अभ्यास करावा. अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

# हरिनाम सप्ताहास आ. हरिभाऊ बागडे यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल येथील सावता नगर येथे संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास माजी विधानसभा अध्यक्ष तथा आ. हरीभाऊ बागडे नाना यांच्या समवेत भेट दिली.
यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ. अनुराधाताई चव्हाण, माजी पंचायत समिती सभापती सौ. सविताताई फुके, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे, माजी पंचायत समिती सदस्य अभिषेक पा. गाडेकर, संतोष जाधव, किरण गायकवाड, रामदास जाधव व परिसरातील सर्व भाविक - गावकरी, महिला - पुरुष यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.
संत शिरोमणी सावता महाराज यांच्या नियोजित



मंदिरासमोर सभागृहासाठी 20 लक्ष रू. निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आदरणीय नानांनी दिले. याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.




महाराष्ट्र Business Katta












# बायकोला सांभाळायला सक्षम, मग आईलाच का नको ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**वर्तमान सामाजिक जीवनात जन्मदात्याचा सांभाळ करण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असुन ज्याला पोटचा गोळा म्हणून सांभाळलं, मोठं केलं तेच कारटे आता माय-बापाला वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवु लागले. पण न्यायदेवता आंधळी नसते. तथा कायदा अशा धेंडावर चाबुकासारखा मारल्यावानी बसतो. असाच एका कौटुंबिक प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाने आईच्या बाजुने निकाल देताना तिच्या लेकराला थेट सवाल केला. तुम्ही बायको सांभाळायला सक्षम आहात तर मग आई का नको? असं म्हणत त्यांनी मुलाला प्रतिमहा दहा हजार रूपये देण्याचे आदेश काढले. व्यंकटमा असे या आईचे नाव असून 84 वर्षाच्या आहेत.**

कर्नाटक निकालाची दखल घेण्यामागे आमची भुमिका सामाजिक दायित्वाची आणि संवेदनशीलतेची असुन वर्तमान सामाजिक जीवनात महाराष्ट्रात हाच प्रश्न ऐरणीवर आलेला असुन बऱ्यापैकी धेंडं आपल्या मातृसंस्थेला थेट वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवताना दिसतात. आश्चर्य म्हणजे सुशिक्षित वर्गात जास्त प्रमाण आणि शहरात मोठ्या प्रमाणावर दिसुन येतो. ग्रामीण भागात अजुन तरी जन्मदात्याविषयी लेकरांच्या मनात असलेली संवेदनशीलता मायेची आणि कर्तव्याची दिसते. वास्तविक पहाता जन्मदात्या आई-वडिलांचा सांभाळ हे तर प्रत्येक समाजात रूढी परंपरानुसार चालत आलेलं कौटुंबिक कर्तव्य आणि जबाबदारीचा भाग असु शकतो. पण यासाठी कायद्याचा आधार घेण्याची गरज भासते यापेक्षा दुर्दैव कोणतं नाही. खरं तर परमेश्वराच्या शोधात देशाच्या चारी दिशा भक्तीभावाने माणसं जातात. पण हे तितकंच स्पष्ट सांगायला पाहिजे की ज्यांच्या कुटुंबात आई-वडिल तेच खरे आपले दैवत आणि त्यातच परमेश्वर ज्याची सेवा मनोभावे करायला हवी. एक काळ एकत्र कुटुंब पद्धतीचा होता ज्यामध्ये उतरत्या वयात काळजी घेणारे अनेक हात असायचे. अलीकडच्या युगात विभक्त कुटुंब पद्धती ज्यातुन जन्मदात्याची परवड त्यांच्याच अवलादीकडून होताना दिसते. त्याची कारणं अनेक असु शकतात. पती-पत्नी नौकरीचा प्रश्न, त्याहुन अधिक आर्थिक परिस्थिती आणि सर्वात म्हणजे पत्नीला सासु-सासरे नको ही रूढ बळावताना दिसते. खरं तर मुलाचं लग्न झाल्यानंतर परक्याच्या घरून सुनबाई म्हणून आलेली मुलगी तिचं दैवत खऱ्या अर्थाने सासु-सासरे कारण जन्मदात्याकडील आयुष्याचा प्रयोग तिचा संपलेला असतो. पण याच सासु-सासऱ्याला लग्नानंतर घराबाहेर काढायला भाग पाडण्यात दोघांच्या सहमतीने निर्णय असतो. पुरूष चुकतो का ? स्त्री ? यापेक्षा ज्या कार्टयाला माय-बापाने जन्म दिला त्याची नैतिकता आणि प्रामाणिकता त्यांचा सांभाळ आयुष्यभर करणं अगदी श्रावण बाळासारखं ही जबाबदारी नव्हे तर कर्तव्य ज्याला मायेचा ओलावा देखील म्हणता येईल. तो जर आपल्या दैवताविषयी मायेच्या धागेतुन कटिबद्ध असेल तर मग पत्नी कितीही कडक लक्ष्मी असली तरीही तिला देखील सासु-सासऱ्याची सेवा करावीच लागते. मात्र दुर्दैवाने पतीने नंदीबैलाचं रूप घेतलं असुन पत्नी सांगल तसं मान डोलावतो त्यातुन त्याची मनःस्थिती मातृ संस्थेच्या विरोधात जाते आणि ज्यांच्यामुळे मी आहे हेच उत्तरदायित्व विसरतो आणि सरळ वृद्धाश्रमाचा शोध घेतो. खरं तर ज्यांच्या संसारात भक्तीभावे आई-वडिलांची सेवा आणि पुजा होते त्यांच्यात परमेश्वराच्या आशिर्वादाने कुठल्याही गोष्टीची कमतरता भासत नाही. आर्थिक, भौतिक सुखाची वाढ होते. लेकरं बाळं असतील किंवा एकुणच संसार अगदी गुलाब बागेसारखा फुललेला असतो. कारण तिथे मातृसंस्था टिकुन असते. पण ज्या कुटुंबात जन्मदात्याची परवड होते मग अनेक यातना त्यांना दिल्या जातात. तिथे देवाचा आशिर्वाद मिळत नाही. पण संसाराचं स्वरूप अगदी ओसाड दुष्काळ स्थितीसारखं पसरलेले असतं. वास्तविक पहाता हे चित्र सद्याच्या समाजात आहे. थोडंसे स्पष्ट यासाठी लिहावं वाटतं की येणारे अनुभव आणि कानावर येत असलेल्या गोष्टी किंवा याच प्रश्नावर न्यायालयात सुरू असणारे झगडे हे सारं ऐकल्यानंतर कुठे चालला समाज असं वाटतं ? कौटुंबिक प्रकरणं हा खरं तर आता न्यायालयाचा अविभाज्य घटक बनला असुन अगदीच तालुका न्यायालयापासुन सत्र, जिल्हा, खंडपीठ, सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे विषय आहेत. जन्मदात्याचा सांभाळ मुलांनी केलाच पाहिजे म्हणुन सरकारला कायदे करावे लागले. एवढेच नव्हे तर भविष्यात असं घडेल हे लक्षात घेवुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा देशाची घटना तयार करताना अनेक कायदे तयार केले. त्याचाच आधार म्हणून आज न्यायालय मातृसंस्थेच्या बाजुने सत्यता सांगु शकते. कुटुंबातील भावंडं स्वार्थाने पैशाच्या मस्तीत चंगळवादाने भारावुन गेलेली असल्याने मी आणि माझी बायको आणि लेकरं याशिवाय त्यांना



काहीच दिसत नाही. कधी तरी न्यायदेवतेलाच असा प्रश्न पडतो की, ही करंटी धेंडं स्वतःच्या पत्नीला सांभाळायला सक्षम, पण मातृसंस्थेलाच का सांभाळत नाहीत ? त्यातूनच एक संवेदनशील निकाल कर्नाटक उच्च न्यायालयाने दिला. ज्यात स्पष्ट सांगितलं की तुम्ही स्वतःच्या बायकोला सांभाळू शकतात तर मग आश्रीत आईला का नाही ? याहून चांगलं म्हणजे त्या कारट्याला दहा हजार रूपये प्रतिमहा आईला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. प्रकरण सांगायचं झालं तर व्यंकटमा 84 वर्षाच्या गोपाल आणि महेश त्यांची लेकरं. हे लेकरं जेव्हा आईचा सांभाळ करत नव्हते तेव्हा म्हैसुरच्या सहाय्यक आयुक्ताने दोन्ही मुलांना प्रत्येकी पाच हजार रूपये देण्याचे आदेश काढले होते. कारण आईने आयुक्ताकडे दाद मागितली होती. तदनंतर लेकरांनी उपायुक्ताच्या उच्च न्यायालयात धाव घेतली आणि त्याचा निकाल देताना दोन्हीही काटर्याला कानपिचक्या देत याचीका दाखल केली म्हणूनच अगोदर पाच हजारांचा दंड ठोठावला. आईला पैसे देण्याएवढे आर्थिक उत्पन्न नाही अशी याचिका दाखल केली होती. न्यायमुर्ती कृष्ण दिक्षीत यांच्या एकल खंडपीठाने निर्णय देताना तुम्ही गरिब आहात हा मुळातच दावा चुकीचा वाटतो. सक्षम पुरूष पत्नीच्या पालनपोषणास बांधील असतो. मग आश्रीत आईबाबतही हाच नियम लागु न होण्याचे कोणतेही कारण नाही. एक भाऊ जेव्हा सदृढ असतो तसाच दुसरा भाऊ असु शकतो असे निष्कर्ष देखील त्यांनी काढले. निकाल देताना न्यायालयाने पुराणातील उपनिषदाचा दाखला दिला. अक्षंती स्थवीरे पुत्र या ओळीचे महत्व पटवुन देताना आयुष्याची सायंकाळ गाठलेल्या आईची काळजी घेणे पुत्राचे कर्तव्य आहे. वृद्ध आई-वडिलांकडे दुर्लक्ष करणे हेच घृणास्पद असुन त्यासाठी कोणतेही प्रायश्चीत नाही.या आधारे स्पष्ट निकाल देत दोन्हीही भावंडांना दहा हजार रूपये प्रति महिना देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. दरम्यान देशात कुठल्याही न्यायालयाने दिलेला सामाजिक निकाल हा सर्वांना सर्व ठिकाणी लागु होतो. आपल्याकडे जन्मदात्याची परवड होणारे प्रकरणं मोठ्या प्रमाणावर वाढत असता किमान अशा धेंडांची डोळे उघडली तर बरं अन्यथा आई-वडिलांनी देखील अशा निकालाचा अभ्यास तथा आधार घेत आपल्या राशीला आलेल्या संघर्षाला तोंड देण्यासाठी काटर्याविरूद्ध न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे क्रमप्राप्त वाटते. अध्यात्मिक शास्त्राचा आधार घेवुन सांगायचं म्हटलं तर जन्मदात्यांची सेवा हा प्रत्येकाच्या कर्तव्याचा भाग असतो आणि पुण्यकर्म देखील असते. पण जेव्हा अशी धेंडं केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी जगतात तिथेच वृद्धाश्रमाची वाट शोधणारी असतात. सांगायचं तात्पर्य की बाळांनो डोळे उघडा, मागे वळुन बघा, जन्मापासुनचा संघर्ष पहा, तुमच्या भविष्यासाठी माय-बापांनी काय खस्ता खाल्या ? आणि हाडाची काडं केली जरा इतिहासाची पानं चाळुन बघा. तुम्ही आज कलेक्टर, तुम्ही आज अधिकारी, एवढेच नव्हे तर जे तुम्ही आहात ते केवळ मातृ-पितृ संस्थेमुळे पण तुमच्या डोळ्यावर स्वार्थाची आंधळी काजळी जडली तिला जरा बाजुला सारा आणि एक घास आई-वडिलांसाठी तरच दुसरा आपल्यासाठी या सद्गुणांने वागा मग बघा तुमच्या आयुष्याचं कल्याण. ज्यांच्या जीवनात आई-वडिलांच्या सांभाळण्यावरून कोर्टाची पायरी चढावी लागते, ज्यांना पत्नी आग्रहामुळे आई-वडिल नको वाटतात अशांच्या संसाराचा उन्हाळा झाल्याशिवाय रहात नाही. कितीही आणि कसंही जगाल तर अपयशाचं भुत पाठ सोडत नाही.

# दीड दिवसातून आयुष्याची शाळा घडविणारे 'अण्णा भाऊ साठे'



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**अखेर झाली ही मुंबई महाराष्ट्राची, परळच्या प्रलयाची, लालबागच्या लढाईची, फाऊंटनच्या चढाईची, झालं फाऊंटनला जंग,तिथं बांधूनी चंग, आला मर्दानी रंग, धार रक्ताची मर्दानी वाहिली माझ्या जीवाची होतीया काहिली... असे म्हणणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या लोकशाहीरितून एक वास्तववादी विचारांचा विद्रोह दिसून येत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांचे अनमोल असे योगदान आहे. आज मुंबईवर डोळा ठेवून असलेल्या अनेक विकृत डोळ्यांना इथला संघर्ष दिसत नाही.असे म्हणावे लागत आहे.मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा वारंवार प्रयत्न केला जात असतो.**

मुंबई सह महाराष्ट्राचा अपमान होईल अशी वक्तव्य आजही महाराष्ट्राच्या भूमीत केली जात असतात.मुंबई कोणाची हा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असताना अशा विकृत लोकांसाठी अण्णाभाऊंच्या शाहिरीचा हा दाखला द्यावाच लागेल. ही मुंबई यंत्रांची,तंत्रांची, जगणारांची, मरणारांची.... म्हणताना दुसऱ्यांवर हुकूमशाहीने वर्चस्व गाजविणारा भांडवलदार नव्हे तर इथला कष्टकरी,श्रमकरी शोषित,पीडित,वंचित घटकांनीच मुंबई कोणी मोठी केली,मुंबई कोणी उभी केली,संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही नुसती चळवळ नव्हती तर तो महाराष्ट्राचा अभिमान होता.मान सन्मान होता.प्राणाची बाजी देणाऱ्या त्या शूरविरांची ही भूमी आहे.वाटेगावहून मुंबईत आलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईसाठी खूप मोठे योगदान आहे.दीड दिवसातून शिक्षणाची माघार घेणाऱ्या अण्णाभाऊंनी स्वतःच्या लोकशाहितुन प्रबोधनाला धार दिली.परदेशात इथल्या मुंबईचा संघर्ष करनाऱ्या श्रमिकांचा कष्टकऱ्यांचा आवाज पोहचविला. पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर वरलेली नसून येथील दलित श्रमिकांच्या,कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे.असे छातीठोकपणे त्यावेळच्या बुरसटलेल्या समाजव्यवस्थेला ठणकावून सांगणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातच रशियातही जयंती साजरी केली जाते असते.इथल्या समाजव्यवस्थेला गुलामगिरीच्या चिखलातून बाहेर काढण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी जो संघर्ष निर्माण केला.तो संघर्ष म्हणजेच मानवादासाठी फुंकलेले रणशिंग होते.सांगली जिल्ह्यामध्ये वाळवा तालुक्यातील वाटेगाव या छोटयाशा खेडेगावात १ ऑगस्ट १९२० रोजी जन्मलेले तुकाराम उर्फ अण्णाभाऊ साठे साहित्यिक क्षेत्रातील एक प्रतिभावंत व समाजाचे वास्तववादी जीवनाचे लेखन करणारे लेखक होते. वाटेगाव ते मुंबई असा थक्क करणारा प्रवासच इथल्या शोषित, पीडित,कष्टकरी,श्रमिकांचा आवाज बनला. लहान वयातच जातीयतेचा जबरदस्त चटका बसल्याने जातीयता नष्ट करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीरीला आत्मसात केले.शालेय जीवनातील शाळेचा पहिला दिवस वर्गाच्या बाहेरच बसून घालवावा लागला होता.दुसऱ्या दिवशी काहीतरी शिकायला मिळेल, म्हणून तुकाराम शाळेत गेले.शाळेतील शिक्षकाने जातीयतेला सर्वोच्च स्थान देवून तुकारामाला वर्गाच्या बाहेरच बसवले. पाटीवर काहीच लिहित नाही म्हणून तुकाराम यांची हाताची बोटे रक्तबंबाळ होईपर्यंत शिक्षकानी काठीने मारले, तेव्हाच तुकारामाची दीड दिवसांची शाळा सुटली आणि जातीयतेच्या अग्निपरिक्षेची आयुष्याशी झगडणारी शाळा सुरु झाली. दीडच दिवस शाळेत गेलेल्या तुकारामाने अण्णाभाऊ बनल्यानंतर ज्या शिक्षकाने मारले होते, त्याच शिक्षकाला आपले आदर्शही मानले. समाजव्यवस्थेत असलेली जातीयता आणि त्या जातीव्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचे धाडस अण्णाभाऊ साठे यांच्यामध्ये निर्माण झाले.

गाव सोडल्यानंतर मुंबईत आलेले अण्णाभाऊ साठे जीवनातील संघर्षानंतर स्वतःच्या कर्तृत्वाने रशियासारख्या प्रगत देशांमध्ये तेथील लोकांना मार्गदर्शन करुन आले.आज अण्णाभाऊ साठे रशियासाठी इतके आदर्शवत बनलेले आहेत की, रशियाच्या पाठ्यक्रम पुस्तकांमध्ये अण्णाभाऊ च्या कार्यकर्तृत्वाचे धडे विद्यार्थ्यांना शिकवले जात आहेत. दैववादी बनू नका, तर कर्मवादी बना, हा अण्णाभाऊंचा सिद्धांत आज रशियाने स्विकारल्याने अनेक क्षेत्रामध्ये रशियाची क्रांति झालेली आहे.अण्णाभाऊंची कर्मवादाची क्रांती खूपच श्रेष्ठ मानली जात आहे. कोणतेही काम कमी न समजणाऱ्या अण्णाभाऊंनी स्वतःची कर्मवादाची भूमिका महाराष्ट्राच्या जनतेला दाखवून दिली आहे. खाण कामगार, गिरणी कामगार, बूट पॉलिश करणारा, कोळशाची वाहतूक करणारा, हमालीचे काम, घरगडी, मुलांना खेळवणारा, हॉटेलमध्ये वेटरचे काम, डोअर किपरचे काम, उधारी वसुली करणारा आदींसारखी अनेक कामे अण्णाभाऊंनी मुंबईस वास्तव्यास आल्यानंतर स्वतःचा जीवन जगण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करीत समाजाला प्रबोधन करण्यासाठी स्वतःची लोकशाहीरी तमाशातून दाखवून दिली. महाराष्ट्रात तमाशा या कलापरंपरेला पुढे आणण्याचे महत्त्वाचे काम अण्णाभाऊ साठे यांनीच केले, आजच्या काळातील तमाशावंतांना, शाहीरांना,



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव आदरानेच घ्यावे लागते. लावण्या, पोवाडे, वगनाट्य यातूनच त्यांच्या ललित साहित्याची निर्मिती झाली.दीड दिवसांची कार्यशाळा शिकलेले अण्णाभाऊ कालांतराने अक्षरांची ओळख करून घेवून लोकयुद्ध नावाच्या साप्ताहिकाचे वार्ताहर, पत्रकार म्हणून काम करीत असताना माझी मुंबई, अकलेची गोष्ट नावाची गाजलेली लोकनाट्ये लिहिली.तमाशाच्या माध्यमातून लोकप्रबोधन घडवित असताना मुंबई सरकारने तमाशांवर बंदी आणली.तमाशाचे रुपांतर लोकनाट्यामध्ये करून समाजप्रबोधन तसेच सुरु ठेवले. वास्तव जीवनातील कठीण प्रसंगांशी झगडताना माणसांप्रती माणुसकी प्राप्त करण्यासाठी अण्णाभाऊ साठे प्रयत्न करताना दिसतात. 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली या पोवाड्यातून मुंबई ही महाराष्ट्राचीच आहे, हे अण्णाभाऊंनी सांगितले. मराठी भाषेला जगविण्याचे काम अण्णाभाऊंनी आपल्या रांगड्या शैलीतील भाषेतून केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबरोबर भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील चळवळ तसेच गोवामुक्ती संग्रामाच्यावेळी अण्णाभाऊंनी शाहीरीच्या माध्यमातून जनजागृतीचे काम केले. 'जगबदल घालुनि, घाव सांगुन गेले, मज भीमराव' या पोवाड्यातून अण्णाभाऊ साठे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी आपल्या कार्याची नाळ जोडित बाबासाहेबांना आपल्या गुरुस्थानी मानले. अस्पृश्य समाजामध्ये नव्या बदलांचे वारे वाहण्यासाठी विविध वास्तववादी लिखाणातून प्रबोधनात्मक कादंबऱ्यांची निर्मिती केली. स्मशानातील सोनं, लाल बावटा, वैजयंता, वारणेचा वाघ, माकडीचा माळ तसेच राज्य शासनाकडून पुरस्कार मिळालेला 'फकिरा' आदी कादंबऱ्यातून त्यांनी सामाजिक गुलामगिरीचे चित्रण केले. अण्णाभाऊंची साहित्यसंपदा फक्त महाराष्ट्राच्या मातीपुरती मर्यादित न राहता इतर हिंदी, गुजराथी, तमिळ, बंगाली या भाषांबरोबर परकीय भाषा समजल्या जाणाऱ्या इंग्रजी, रशियन, फ्रेंच भाषांमध्ये पोहोचलेली आहे. कम्युनिस्ट विचाराचे असलेले अण्णाभाऊ साठे कम्युनिस्ट पक्षासाठी कार्यरत होते. मातंग समाजाच्या परिवर्तनाबरोबर संपूर्ण मानवजातीवर माणुसकीच्या परिवर्तनाची छाप पाडणारे -अण्णाभाऊ साठे शेवटी आपल्याच देशात अन्नाला महाग झाले होते.१८ जुलै १९६९ साली अण्णाभाऊचे निधन झाले.परंतु त्यांचे साहित्य आजही अजरामर आहे.कोणतेही शिक्षण न घेतलेले अण्णाभाऊ आज आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात ही दिसतात.दीड दिवसांतून आयुष्याची शाळा घडविणारे,विद्रोह करणारे, वास्तववादी लिखानातून न्याय मिळवुन देणारे न्यायिक कर्मवादी अण्णा भाऊ एक थोर लेखक साहित्यिकच म्हणावे लागतील.असा साहित्यिक पुन्हा होणे नाहीच असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

# निद्रेशी मैत्री हे दारिद्र्याला निमंत्रण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**निद्रेशी मैत्री हि वरकरणी सुखद असते. ही मैत्री बहुतांश सगळ्यांनाच हवी असते .पण दुरगामी परिणाम पाहिले तर ही मैत्री लाभदायक ठरत नाही. निद्रेशी मैत्री हा यशस्वी जीवनातील सगळ्यात मोठा अडथळा असुन हा अडथळा ज्याला पार करता आला त्याच जीवन सार्थक झाल्याशिवाय रहात नाही.आपल आयुष्य सुखमय असलं पाहिजे. ही प्रत्येकाची अपेक्षा असते.त्या सोबतच आपण आपल्या जीवनात यशस्वी पणे प्रगती केली पाहिजे . त्यासाठी आपण प्रयत्नशीलही असतो.आपली प्रगती व्हावी या साठी धडपडत असताना यशस्वी होण्यासाठी काही बाबींच पालन आपल्याला निश्चितच कराव लागतं. जीवनात अलौकिक असं यश मिळालं पाहिजे अशी आशा अपेक्षा महत्वकांक्षा असणं या मध्ये गैर असं काहीच नाही.**

पण त्यासाठी फक्त अपेक्षा असुन चालत नाही तर प्रचंड मेहनत, कष्ट घेण्या सोबतच निद्रेच्या चक्रव्युहात आपण अडकणार नाहीत अथवा आपल्या यशो मार्गाआड निद्रा येणार नाही याची काळजी दक्षता घेणं अत्यंत गरजेचे असत.जीवनात काही विशेष कामगिरी करण्याची अपेक्षा असेल तर काही पथ्य हि जीवनात पाळावीच लागतात . यशस्वी होण्यासाठी निद्रा हि आपल्या पासून अलिप्त ठेवता आलीच पाहिजे. यशस्वी आयुष्य आणि निद्रा यांचा घनिष्ठ असा संबंध असतोच .जसं धेय्य तशी निद्रा असते. आपलं धेय्य जर उच्चतम असेल तर आपोआपच आपली निद्रा देखील कमी होत जाते . धेय्य उच्चतम आणि सार्थक नसेल तर मग आरामच आराम असतो. तसं पाहिलं तर जीवनातील विविध क्षेत्रातील यश अपयश यांचा थेट संबंध हा निद्रेशी असतोच. ज्या पद्धतीने आपण आराम करतो अथवा कष्ट करतो त्या नुसार परिणाम देखिल अनुभवास येत असतात. आळस, येणं थकवा,येणं स्वाभाविक आणि सहाजिक आहे पण तो घालविण्यासाठी जरी निद्रा आवश्यक असली तरी त्याचे प्रमाण किती याला मर्यादा असते. प्रमाण म्हणून प्रमाण पाळल गेलं पाहिजे.जीवनात निद्रेशी मैत्री करू नका विश्रांती आवश्यक आहे पण त्याला काही मर्यादा आहे. ती मर्यादा पाळून विश्रांती घेण्यास हरकत नाही पण त्या सोबत मैत्री होता कामा नये. आपण फक्त मोठी झालेली माणस पाहतो ऐकतो पण जी माणसं वेगवेगळ्या क्षेत्रात मोठी झालेली आहेत अथवा त्यांनी आपलं नावलौकिक निर्माण केलेलं आहे हे नावलौकिक सहज निर्माण झालेलं नाही त्यासाठी रात्रीचा दिवस त्यांनी केलेला आहे हे वास्तव आहे. आणि विशेष म्हणजे यशस्वी व्यक्तिमत्व हे कधीच निद्रेशी मैत्री स्वीकारत नाहीत. निद्रा हि त्यांच्या दृष्टीने गौण असते . नावलौकिक मिळवणाऱ्या व्यक्तिच्या जीवनात निद्रेचा दुष्काळ असतो .जिथं निद्रेचा सुकाळ आहे तिथं दारिद्र्याचे पिक जोमात फोफावत आणि जिथे दुष्काळ आहे तिथे मात्र आदर्श व्यक्तिमत्व घडत. स्वतःला घडावायच असेल तर निद्रेला शुन्य महत्व असल पाहिजे. जगातील अनेक अशा मोठ्या घडामोडी ह्या रात्री अपरात्रीच घडत असतात आपल्या नजरेत जी माणसं मोठी असतात ती रात्री उशिरापर्यंत कार्य मग्न असतात आणि सकाळी सुद्धा भल्या पहाटे पासुन त्यांचं कार्य चालू असतं. त्यांच्या कामाचा आवाका एवढा मोठा असतो कि निद्रा ही त्यांच्या लेखी नगण्य बाब आहे जेव्हा शरिर आति थकेल तेव्हा त्याला थोडी विश्रांती दिली पाहिजे.पण दिनचर्या ही जास्तीत जास्त कार्य मग्नच असली पाहिजे.निद्रा आवश्यक आहे पण किती याला प्रमाण असलं पाहिजे. शालेय दशेत विद्यार्थी शिकत असताना किती आराम करावा याला मर्यादा असते .शरिर थकवा, विश्रांती हि आवश्यक आहे पण प्रमाण मर्यादेत असलं पाहिजे. प्रमाण मर्यादा पाळली गेली तर हित होत आणि ओलांडली गेली तर अहित होण निश्चित आहे.आळस थकवा निरूत्साह हे नेहमी नकारात्मक असतात आणि त्यामुळे फक्त आणि फक्त अहितच होत. तर चैतन्य हे नेहमीचं उत्साह वर्धक असत . जीवनात सकारात्मक ऊर्जेचा संचार सदैव राहण्यासाठी तसंच जीवनाला योग्य दिशा उपलब्ध होण्यासाठी आळस वृत्ती ला कोणत्याही प्रकारचा थारा देता कामा नये.जेणेकरुन त्याचा प्रभाव आपल्या जीवनशैलीवर झाला तर आपल प्रचंड नुकसान होण हे निश्चित असतं.निद्रा हि आवश्यक आहे पण मर्यादित असली पाहिजे.हे सुत्र जीवनात काटेकोर पणे पाळल गेलंच पाहिजे. आपण आपल्या जीवनाविषयी किती सकारात्मक आहेत त्यानुसारच आपला उत्साह चैतन्य हे अवलंबून असतं. जीवनात काही सत्य असतात आणि हेच सत्य स्वीकारलं तर परिणाम योग्य येतात . आणि सत्य पचणी पडल नाही तर मग मात्र



फार काही उल्लेखनीय फायदा होत नाही . जीवनात आपलं सख्य कोणाशी आहे हे खुप महत्वपूर्ण ठरत. जसं सख्य तसे परिणाम हा जीवनाचा आलेख असतो. निद्रा नियंत्रण करण्यासाठी अथवा आपल्या जीवनात आपल्याला निद्रा कमी करून आपलं हित करायचं असेल तर आपण आपल्या जीवनशैली मध्ये सुधारणा केली पाहिजे .जसं हलका व पौष्टिक आहार त्याच प्रमाणे शारीरीक कसरत हि नियमित आवश्यक आहे.

# ग्रामीण जीवनाचं समृद्ध चित्रण : 'मायबाप'



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**मराठवाड्यातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर हे एका गरीब, सामान्य शेतकरी, मजूर कुटुंबातून आलेले आहेत. शिक्षण घेत असताना त्यांना स्वतः मजुरी करावी लागली. बँडबाजा पथकात काम करून त्यांनी आपले स्वतःचे शिक्षण पूर्ण केले आणि कुटुंबाला देखील हातभार लावला .अत्यंत संवेदनशील असणारे कवी अय्युब पठाण यांनी बालपणापासून जे जे अनुभवलं ते ते शब्दबद्ध करण्याचं काम केले आहे. त्यांच्या जीवनाचे आणि जगण्याचे खडतर अनुभव त्यांच्या साहित्यात उमटतात. 'मायबाप' हा त्यांचा आठवा कवितासंग्रह आहे. या अगोदर त्यांचे जिव्हाळा, वाजंत्री, अनाथ, मला साळंत जायचं ,पानपोई,आईचा हात इत्यादी कवितासंग्रह आणि झुंबरी, गोदाकाठचा गावकुस ,पानक्या, मर्मबंध हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.**

औरंगाबादचे प्रसिद्ध कवी फ.मु.शिंदे यांच्या घरी त्यांच्या हस्ते सदरील 'मायबाप' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी बालसाहित्यिक लीलाताई शिंदे ,कवी अय्युब पठाण,हबीब भंडारे, संजय खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मायबाप या कवितासंग्रहात चौऱ्यांणव प्रौढ आणि बालकविता अंतर्भूत आहेत.

लहान मुले कल्पनाविश्वात रमतात. परी ,बाहुली, चिऊताईच लगीन, प्राण्यांची किल्ले ,चांदोबा ,चंद्रावरची शाळा, चांदोबाचे घर , चिऊताई अशा अनेक कवितांमधून बालमनाच्या कल्पनाविश्वाला कवी अय्युब पठाण यांनी फुलविले आहे .'चांदोबा' या कवितेतून ते म्हणतात ,

**रात्रीला भरते तुझी शाळा चांदण्याचे खडू ,आकाशाचा फळा सारे काढतात सुंदर माळा ढगांना लागे शाळेचा लळा बाल मनाला बऱ्याच वेळेस आकाशात उडावं, सगळं आकाशातून कसं दिसतं ते पहावं असं वाटत राहतं.**
त्या भावना कवींनी परी या कवितेतून मांडल्या आहेत,
**परी गं परी मी तुझ्या पाठीवरती बसून**
**सगळे सुंदर जग पाहून येई फिरून** मुलांमध्ये मूल्यांची रुजवणूक व्हावी या हेतूने देखील कवींनी अनेक कवितांची गुंफण केली आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता ,बंधुभाव, सर्वधर्मसमभाव अशी मुल्य त्यांच्या बालकविता मधून रुजविली जातात.

डोरेमॉन या कवितेतून सर्व धर्माच्या लहान मुलांची नावे दिसून येतात. **बाल गोपाल जमले छोटा भीम, क्रिश आला सिनचॅनला बोलावून डोरेमॉन सुद्धा आला**
पावसाचं आणि शेतकऱ्याचं अतूट नातं असतं . पाऊस पडला की शेतकरी आनंदून जातो. पिके डोलायला लागतात. तसंच लहान मुलांचे देखील असते. पाऊस आला की मुलांना घरा बाहेर जावं वाटतं, अंगणात पावसात भिजावं वाटतं. कवीला पावसाच्या या भावना दाटून येतात. या काव्यसंग्रहात त्यांच्या पावसाशी संबंधित असलेल्या पाच कविता समाविष्ट आहेत. आई पाऊस दे!, दिवस पावसाचे, मिरगाचा पाऊस आणि पावसाळा. पावसाशी संबंधित असलेल्या प्रत्येक कवितेत वाचक कविता वाचत असताना चिंब चिंब भिजून जातो .

**या पावसाने सगळा शिवार हा चिंब केला तृप्त झाली काळी भुई, सारा परिसर न्हाला** कवीला ऋतूंचा झालेला बदल भावतो .पावसाळा, वसंत ऋतु ,थंडीचे दिवस आणि उन्हाळा अशा कवितेमधून कवींनी ऋतु बदलाच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. वसंत ऋतु कवितेतून कवी म्हणतात ,


**आला हा वसंत ऋतू, सारी सृष्टी बहरली लाल-केशरी फुलांची , चादर ही पांघरली...** कवीच्या सामाजिक जाणिवा अत्यंत प्रगल्भ आहेत. माणूस समाजशील प्राणी आहे. समाजाला, माणसाला सण-उत्सव प्रिय आहेत. कवीचं संवेदनशील मन या सणांना उत्सवांना आपल्या लेखणीतून सुंदररित्या मांडत आहे . कवी बकरी ईद, रमजान ईद या सणांचा उल्लेख करतात. त्याचबरोबर हिंदू समाजाच्या दिवाळी ,नवे वर्ष, महाशिवरात्र, रक्षाबंधन ,दहीहंडी ,मकर संक्रांत इत्यादी सणावर देखील त्यांच्या कविता दिसून येतात. नाताळ या ख्रिश्चन बांधवांच्या सणावर देखील त्यांची कविता या कविता संग्रहात समाविष्ट आहे. राष्ट्रीय सण प्रजासत्ताक दिन यावर देखील त्यांची कविता आहे. म्हणजेच सर्वधर्मसमभावाचे तत्व कवीच्या खोल मनात किती रुजले आहे ते या ठिकाणी दिसून येतं. रमजान या कवितेतून कवी म्हणतात,

**पाच वेळेची नमाज रोज पढण्यात येई पहाटे सेहरी आणि सूर्यास्त इफ्तार होई**

दिवाळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. दिवाळी हा अनेक सणांचा एकत्र असा मेळा घेऊन येतो.**फटाके वाजे जोमाने , दिव्यांने सजे अंगण पंचपक्वान- भोजन, आला दिवाळीचा सण**.. आपले महापुरुष आणि संत हे सातत्याने आपल्याला मार्गदर्शक ठरले आहेत. संत तुकाराम, संत तुकडोजी महाराज , संत गाडगेबाबा ,गुरुनानक, जाणता राजा शिवाजी ,राजमाता जिजाऊ, भीमराव प्रणाम ,महात्मा फुले, सावित्री माय, लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे , इंदिरा गांधी ,स्वर लता ,अनाथांची माय इत्यादी चौदा कवितांमधून संत महापुरुषांचे व्यक्तीचित्रण करणाऱ्या कविता आल्या आहेत. महात्मा फुले या कवितेतून कवी म्हणतात,

**पुण्यात मुलींची शाळा काढली स्त्री शिक्षणाची हिम्मत वाढली**

ज्ञानासारखी पवित्र गोष्ट या जगात दुसरी कोणतीच नाही. म्हणूनच कवी 'मी ज्ञानपोई होईन' या कवितेतून अविरत ज्ञानदानाचे कार्य करण्याचा संकल्प करीत आहे. साक्षरता या कवितेतून सर्वांनी शिकावं, पुढे जावं असं सांगत शिक्षणाचे महत्व त्यांनी मांडलं आहे . 'पुस्तकांशी दोस्ती' या कवितेतून वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पुस्तकांशी दोस्ती या कवितेत कवी म्हणतात, **जे सूर्याला न दिसते ते पुस्तकात असते पुस्तकांचे आणि आपले नाते दोस्तीची असते.**




आपलं गाव, आपला परिसर, आपलं राज्य ,आपला देश याचा अभिमान वाढवणारी कविता अय्युब पठाण मोठ्या सामर्थ्याने लिहितात. त्याची सुरुवात माझे गाव, शिवार, आनंदाचे गाव ,माझा मराठवाडा, महाराष्ट्र माझा या कवितातून दिसून येते. या काव्यसंग्रहात पहिली कविता 'महाराष्ट्र माझा' मध्ये ते म्हणतात, **शूरविरांनी इथे प्राणाची लावून बाजी या राष्ट्रसाठी लढले मावळे राजे शिवाजी** राष्ट्राचा अभिमान वाढवणाऱ्या तिरंगा, प्रजासत्ताक दिन, ऑगस्ट क्रांती या कवितादेखील वाचकाच्या मनात आपल्या पूर्वजांविषयी आदरभाव वाढवितात. प्रजासत्ताक दिन या कवितेत कवी म्हणतात, **प्रजासत्ताक राष्ट्र भारत सरकार**
येथे थोर रत्न फुले-शाहू-आंबेडकर आम्ही माथा टेकतो तुमच्या चरणावर हे भारत माता जय जय कार आपल्याला लहानचे मोठे करत, संस्कार देत ,आपले आई-वडील मोठे परिश्रम आणि कष्ट घेतात. त्यांच्या विषयीची कृतज्ञता त्यांच्या मायबाप,आई, माझी आई , माहेर या कवितेतून दिसून येते .मायबाप कवितेत कवी म्हणतात, **जेव्हा मस्तक टेकतो माय बापाच्या चरणी दुवा देई मायबाप**
**घर होई आबादानी.** अशी आई वडिलांची माहिती सांगणारी ही कविता काव्यसंग्रह पुस्तकाच्या नावासाठी सार्थ ठरते. कोरोना काळात मानवी जीवन मोठे दोलायमान झाले. अनेक आप्तेष्ट आपल्याला सोडून गेले .त्या वेदना त्यांनी 'सरण' या कवितेतून मांडल्या आहेत. **कोरोनाच्या संकटात यमा वर ताण आले कोरोणाने माणसाचे मरण हे स्वस्त केले.**

मानवी जीवनाचे वास्तव सार माणसा रे !, जीवनात आणि जीवनाचे मर्मगंध या कवितेत कवीने मांडले आहे. प्रौढ व बाल कविता असलेला हा कवितासंग्रह वाचकांना नक्कीच आवडेल अशी खात्री आहे.

**पुस्तक- मायबाप (काव्यसंग्रह)**
**कवी- अय्युब पठाण लोहगांवकर**
**प्रकाशक - तेजस प्रकाशन औरंगाबाद**
**बल्ब- डॉ.श्रीकांत पाटील**
**मूल्य- १००/-**
**पुस्तक परीक्षण - संजय खाडे, औरंगाबाद.**




# दुर्गम भागात मूलभूत सुविधांचा अभाव

आधुनिक केसरी

**राज्यात "शासन आपल्या दारी" हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविला जात आहे.ही अत्यंत चांगली गोष्ट आहे.परंतु खरे वास्तव्य धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील थुवानपाणी या अती दुर्गम भागातील आदिवासी गावात धड रस्ताही नसल्याने गर्भवती महिलेला दिनांक 15 जुलै रोज शनिवारला बांबूच्या झोळीतून 6 किलोमीटर पायपीट करीत रूग्णालयात दाखल करावे लागले.ही महाराष्ट्र सरकारची शोकांतिका म्हणावी लागेल.**

सरकार म्हणते की शासन आपल्या दारी खरोखरच शासन आपल्या दारापर्यंत पोहोचला आहे का याचाही गांभीर्याने सरकारने विचार करण्याची गरज आहे. सरकार अनेक योजना गावगाड्यापर्यंत पोहचविण्याचे दावा करीत आहे.याच माध्यमातून शासन आपल्या दारी ही मोहीम राबविण्यात येत आहे.परंतु शिरपूर तालुक्यातील थुवानपाणी या अतिदुर्गम भागातील




रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

गर्भवती महिलेला पाहून असे वाटते की महाराष्ट्र सरकार अजूनही गावगाड्यापर्यंत मुलभूत सुविधा पुरविण्यात असमर्थ असल्याचे दिसून येते. ही समस्या आजची नसून अनेक वर्षांपासूनची जशीच्या तशीच आहे. महाराष्ट्रात अनेक पक्षांची सरकारे आलीत आणि गेलीत परंतु गेल्या 76 वर्षांपासून गावगाडा हा गावगाडा रहाला हे थुवानपाणी गावावरून लक्षात येते. शहरातील रस्त्यांची सुविधा आवश्यक आहे यात दुमत नाही व त्याचा लाभ सर्वांनाच होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु अती दुर्गम भागात गाडी, घोडे, सायकल, बंडी किंवा इतर वाहन चालण्यालायक कमीत कमी रोडची सुविधा असती तर गर्भवती महिलेला इतक्या असहय्य वेदना झेलाव्या लागल्या नसत्या. आदिवासी दुर्गम भागात प्रसुतीकळा असह्य झाल्याने गर्भवती महिलेसाठी तातडीची सुविधा म्हणजे बांबूची झोळी.कधी रात्री, कधी भरपावसात तर कधी कडाक्याच्या थंडीत तर कधी तळपत्या उन्हात हा जीवघेणा प्रवास आजही थांबलेला नाही.भारत स्वतंत्र होवून 76 वर्ष झालीत परंतु आताही अती दुर्गम भागातील महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण भारतात आदिवासींच्या समस्या जशाच्या तशाच असल्याचे या घटनेवरून दिसून येते याचे जीवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.हा सर्व प्रकार मुलभूत सुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेला आहे. शिरपूर तालुक्यातील थुवानपाणी या गावात किमान मूलभूत सोयीसुविधाही नाहीत.शिरपूर तालुक्यातील गुह्राळपाणी गट ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या या गावात चालण्यायोग्य रस्ता नाही.त्यामुळे प्रसुतीकळा असह्य झालेल्या लालबाई मोतीराम पावरा या आदिवासी महिलेसाठी बांबूला फडके बांधून त्याची झोळी करावी लागली. या गावापासून 6 किलोमिटरवर असलेल्या गुह्राळपाणी आरोग्य केंद्रात त्यांना आणण्यात आले. तेथून रूग्णवाहिकेतून 20 किलोमीटरवरील वकवाड आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.या जीवघेण्या प्रवासानंतर महिलेची प्रसूती सुरक्षित झाली.यावरून स्पष्ट होते की आजही महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील किंवा अतिदुर्गम भागातील 20 टक्के लोकांपर्यंत मुलभूत सुविधांचा अभाव असल्याचे दिसून येते.हीच परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये राहु शकते याला नाकारता येत नाही.आपण अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहो.परंतु त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते गावखेडे किंवा अती दुर्गम भागात जातीने लक्ष घालून कमीत कमी मुलभूत सुविधा पुरविणे.परंतु ग्रामीण भागात किंवा अती दुर्गम भागात मुलभूत सुविधा पोहचविल्या जात नाही याचे जीवंत उदाहरण आपल्याला शिरपूर तालुक्यातील थुवानपाणी गावात दिसून आले. याकरीता सरकारला विनंती करतो की चालू अधिवेशनात यावर गांभीर्याने विचार करून गावखेडे भागात व अतिदुर्गम भागात मुलभूत सुविधांवर जास्त भर देवून ग्रामवासीयांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा!

# सत्तेचा गोडवा चाखण्यासाठीच राजकीय उलथापालथी

आधुनिक केसरी

**भ्रष्टाचार को सियासत समझ बैठे है सत्ता के नशे मे इतने चुर है ये नेता की देश को अपनी रियासत समझ बैठे है... राज्यात अलीकडच्या काळात ज्या राजकीय उलथापालथी सुरू आहेत त्या राज्याच भल करण्यासाठी केलेला उठाव असे लेबल जरी बंडखोर नेत्यांकडून लावल्या जात असले तरीही ह्या उलथापालथी सत्तेचा गोडवा चाखण्यासाठी आणि आपला भ्रष्टाचार झाकण्यासाठी केल्या जात असल्याची पक्की धारणा जनतेची झालेली आहे. निष्ठा,नैतिकता, विचारधारा हे सारं काही केवळ बोलण्यापूरत उरलेल आहे. अलीकडच्या काळातील राजकीय स्थित्यंतर पाहू जाता, व्हाट्स अप वर फिरणारा मॅसेज आजच्या लोकशाहीचे नागडे दर्शन घडवतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



निवडणूक विभागाने आमच्या बोटाला आता शाई ऐवजी चुना लावावा या आशयाचा फिरणारा संदेश लोकशाहीची राजकारण्यांनी किती लक्तरे टांगली आहेत हे दाखवतो आहे.

वर्षाभरापूर्वी शिवसेनेत झालेलं बंड अथवा शिंदे गटाच्या भाषेतील उठाव जुना होतो ना होतो तर राष्ट्रवादीमधील बंडाळी समोर आली. मतदारांच्या मतांचे मूल्याला नेतेमंडळींनी कुठलाही अर्थ ठेवला नाही. स्वतःची अनेक प्रकरणे झाकण्यासाठी, आणि सत्तेतून पैसा प्राप्त करण्यासाठी होत असलेल्या राजकीय कोलांटउड्या मतदारांना अजिबात पचनी पडलेल्या नाहीत. उद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. या निवडणुकीत कार्यकर्त्यांना मतदारांच्या समोर जावे लागणार आहे.खरी कसोटी ही कार्यकर्त्यांची लागणार आहे. कारण नेते आज सुपात ( आणि सत्तेच्या सुखात ही ) आहेत मात्र दुसरीकडे कार्यकर्ता हा जात्यात आहे. कार्यकर्त्यांचं भरडल्या जाणं निश्चित आहे. ह्या उलथापालथीचा प्रचंड राग लोकांच्या मनात धगधगतो आहे.मात्र आज रोजी तो राग व्यक्त करण्याची कुठलीही मुभा त्याच्या हाती नाही,सत्तेपुढे शहाणपण चालत नाही याची सर्वसामान्य मतदाराला पूर्ण जाणीव आहे. लोकांच्या स्मरणशक्ती पेक्षा विस्मरणशक्ती अधिक दांडगी असल्याने आजपर्यंत स्वार्थी नेत्यांचे आजपर्यंत फावले आहे. वेगवेगळी आमिषे दाखविली,आरक्षण- अथवा जातिजाती मध्ये बेबनाव केला की,मतदारांच्या एकजुटीत मिठाचा खडा टाकल्या जातो.

**तुझको देखा तेरे वादे देखे**
**उंची दिवार के लंबे साये**

या बाकी सिद्दीकी च्या ह्या दोन ओळी सगळं काही सांगून जातात. अलीकडच्या काळात राज्यात ज्या घडामोडी घडल्या आहेत त्याचा दूरगामी परिणाम सर्वसामान्यांच्या मनावर झालेला आहे.तो आता सहजासहजी पुसल्या जाणारा नाही. पुढील काळात आपल्या समोरच्या पिढी साठी राजकीय- सामाजिक वातावरण चांगले ठेवायचे असेल तर यावेळी सजग राहून कुठल्याही प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष राजकीय चालींना बळी न पडण्याची काळजी सुजाण मतदार घेणार आहेत.मतांचे विभाजन करण्यात पटाईत असलेल्या राजकारण्यांच्या कुटील राजनीतीला बळी न पडता,सद्सद्विवेक बुद्धी शाबूत ठेवून लोकशाहीला वाचविण्याची मोठी जबाबदारी मतदारांच्या खांद्यावर येऊन पडलेली असल्याने मतदारांच्या हातात सूत्र हाती येताच अशा सत्तापिपासू लोकांना कुत्र देखील विचारणार नाही याची काळजी मतदार घेत असून तो आता त्या संधीची वाट बघतो आहे. सध्या मतदारांची मानसिकता जी झाली आहे त्यासाठीचा एक शेर आठवतो...

**सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही**
**मेरी कोशीष है की ये, सुरत बदलनी चाहीये...**



प्रा. डॉ. वाल्मीक सरवदे
संपर्क क्र. 9423780549

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020: संधी व आव्हाने

आधुनिक केसरी


**परिवर्तन हा मानवी जीवनाचा आधार आहे. परिवर्तन अपेक्षित असेल तर बदल हा येणारच. बदल स्वीकारले तरच परिवर्तन शक्य आहे. भारत देशाची लोकसंख्या 145 कोटीच्या वर आहे त्यामध्ये उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाच करोडच्या पुढे आहे या सर्व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नोकरीच्या व व्यवसायाच्या संधी मिळणे आवश्यक आहे यासाठी देशपातळीवर उच्च शिक्षणाचे महत्त्व व्याप्ती व संधी याचा विचार केल्यास उच्च शिक्षणामध्ये बदल हे अनिवार्य आहे . त्यासाठी देशाच्या शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: 2020 ची योग्य आखणी केली व वेगवेगळे घटक लक्षात घेतले व राष्ट्रीय शिक्षणाची मुहूर्त मेड रोवली.**

2020 मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आखणी करून प्रमुख शिक्षक तज्ञांच्या मदतीने उच्च शिक्षणाच्या धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी योग्य प्रयत्न सुरू केले आहेत यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारच्या मदतीने प्रत्येक राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग ए आय सी टी इ केंद्रीय व राज्य पातळीवरील विद्यापीठे प्राध्यापक अधिष्ठाता कुलगुरू कुलपती यांच्या मदतीने देशभर वेगवेगळ्या समाज घटकांना यामध्ये विद्यार्थी; पालक; शिक्षक; व्यापारी; शेतकरी; व सामाजिक प्रतिनिधी यांना शैक्षणिक धोरणाविषयी अवगत करने हे अंतिम टप्प्यामध्ये आहे.

राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरणांचे फायदे.

राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरणे चार वेगवेगळ्या विद्याशाखेच्या माध्यमातून प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये चॉईस बेस्ट क्रेडिट पद्धत; बहुपर्यायी पद्धत; श्रेयांक पद्धत आणि अकॅडमिक बँकेत हस्तांतरण करणे याच्या माध्यमातून आपली महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवणे विद्यापीठ व महाविद्यालयांना ऍटोनॉमिच्या माध्यमातून बहुपर्यायी उपलब्ध करून देणे व वेगवेगळे विषय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे.पाच अधिक तीन अधिक तीन अधिक चार ही शिक्षणाची संरचना राबवून अकरावी झाल्यानंतर चार वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश देणे त्याचबरोबर पाच वर्षाचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुद्धा पर्याय म्हणून उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक सत्राला 22 क्रेडिट एक वर्षाला 44 क्रेडिट च्यां माध्यमातून एक वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.दुसरे वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला डिप्लोमा प्रमाणपत्र दिले जाणार आहे. तिसरे वर्ष पूर्ण केल्यानंतर बॅचलर डिग्री व चौथे वर्ष पूर्ण केल्यानंतर त्या विद्यार्थ्याला संशोधन किंवा ऑनर्स ही पदवी दिली जाणार आहे. हा चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरच तो विद्यार्थी आपल्या आवडीच्या विषयामध्ये पीएचडी करू शकतो यामध्ये विद्यार्थ्यांचे दोन वर्ष वाचणार आहेत. महाविद्यालयामध्ये एक वर्ष पूर्ण केल्यानंतर त्याला जर बाहेर पडायचे असेल तर तो विद्यार्थी बाहेर पडू शकतो व नंतर एक वर्षानंतर पुन्हा तो विद्यार्थी आपल्या प्रस्तावित अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो म्हणजेच एन्ट्री व एक्झिट ही महत्त्वाची व फायद्याची संधी या राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्याला मिळणार आहे.

डिजिलॉकर मध्ये विद्यार्थी आपली नोंदणी करून आपल्या आयडी व पासवर्ड च्या माध्यमातून आपली महत्त्वाची कागदपत्रे उदाहरणार्थ डिग्री व marks memo डिजिलॉकर मध्ये सुरक्षित ठेवू शकतो. चार वर्षाच्या प्रस्तावित अभ्यासक्रम निवडून मेजर म्हणजे आपल्या शाखेची संबंधित नऊ श्रेयांक निवडू शकतो त्यानंतर तीन श्रेयांक मायनर चे दुसऱ्या शाखेचे निवडू शकतो दोन क्रेडिट भाषा विषयाचे निवडू शकतो त्यानंतर दोन क्रेडिट स्किल बेस्ट अभ्यासक्रमाचे तर दोन क्रेडिट हे जनरिक इलेक्टिव्ह हे दुसऱ्या कोणत्याही



शाखेचे तो निवडू शकतो. म्हणजेच एका सत्रामध्ये 22 क्रेडिट व दुसऱ्या सत्रामध्ये 22 असे यकुन 44 क्रेडिट घेऊन तो विद्यार्थी प्रमाणपत्र मिळवू शकतो अशाच प्रकारे चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तो विद्यार्थी बीए.बी कॉम;बी बी ए; बी एस सी व बीसीए रिसर्च किंवा ऑनर्स ही पदवी संपादन करू शकतो.अर्थात ही 176 क्रेडिट ची चार वर्षाची पदवी हा विद्यार्थी मिळू शकतो व नोकरी किंवा एखादा व्यावसाय सुरू करू शकतो. अर्थातच व्होकेशनल व स्किल बेस्ड ज्ञान विद्यार्थ्याला या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्याला मिळणार आहे ही एक मोठी संधी विद्यार्थ्याला या स्पर्धेच्या जगात टिकून राहण्यासाठी मिळणार आहे.

ए बी सी अकॅडमी बँक ऑफ क्रेडिट ला विद्यार्थी च्या माध्यमातून नोंदणी करू शकतो व आपण एक वर्षात कमावलेली क्रेडिट तो या अकॅडमिक बँकेत ठेवू शकतो. या विद्यार्थ्याला एखादे सत्र पूर्ण केल्यानंतर दुसऱ्या सत्रात किंवा दुसऱ्या वर्षात दुसऱ्या महाविद्यालयात किंवा दुसऱ्या विद्यापीठात जाऊन सुद्धा क्रेडिट कमावता येतात याला कसल्याही प्रकारची तांत्रिक अडचण सुद्धा येणार नाही.त्यानंतर ज्या विद्यापीठाचे 50 ते 60 टक्के क्रेडिट तो विद्यार्थी घेईल ते विद्यापीठ त्या विद्यार्थ्याला पदवी प्रदान करेल ही एक महत्त्वाची संधी या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्याला मिळणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मोठ्या प्रमाणावर लवचिकता आहे वेगवेगळ्या शाखांमध्ये प्रवेश व निर्गमन. Shreyankikaran व हस्तांतरण बहुविद्याशाखीय शिक्षण नवीन व्यवसायासाठी लागणारे कौशल्यावर आधारित शिक्षण पाच वर्षाच्या एकात्मिक अभ्यासक्रम शिकण्याची संधी. बहुविध प्रवेश निर्गमन पर्याय.श्रेयाकाचे चलन आणि गतिशीलता शेयांक व्यवस्थेची रचना शैक्षणिक श्रीयांकाची बँक. परिणामावर आधारित अभ्यासक्रमाची योग्य रचना या सर्व संधीच्या माध्यमातून अमुलाग्र परिवर्तन घडवून आणून जागतिक स्तरावर योग्य शैक्षणिक पर्याय देऊन स्पर्धा करणे सोपे होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोरील आव्हाने

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे या अगोदर 1968 1986 या वर्षात राबवण्यात आले व त्या माध्यमातून मोठे बदल करण्यात आले आहेत. त्यानंतर 2020 मध्ये तिसरे शैक्षणिक अमुलाग्र परिवर्तन घडवणारे शैक्षणिक धोरण प्रस्तावित केले आहे व ते आजच्या जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक देखील आहे तरी परंतु काही आव्हाने देखील या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून उभे राहतात त्यामध्ये या शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत विद्यार्थी पालक व्यापारी शेतकरी शिक्षक प्राध्यापक यांच्यामध्ये समन्वय ठेवून जनजागृती करणे आवश्यक आहे.त्याचबरोबर भारतीय संस्कृती व समाज रचना व सामाजिक मूल्य बाजूला पडणार नाहीत याची योग्य ती काळजी घेऊन सर्वसामान्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे व याबाबतीत असे काहीही होणार नाही याबाबत विद्यार्थी पालक व समाज घटकांना याबाबतीत अवगत करणे गरजेचे आहे. या निमित्ताने आपल्या मातृभाषेत शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्याला मिळणार आहे. विद्यार्थ्याला आपल्या मात्र भाषेत शिक्षण घेऊन शिक्षण घेता येणार आहे परंतु इंग्रजी व इतर परकीय भाषा विद्यार्थी शिकला नाही तर तो जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकेल का हे पाहणे देखील गरजेचे आहे या अभ्यासक्रमामध्ये इंट्री व एक्झिट होण्याची सोय आहे परंतु एक वर्षानंतर विद्यार्थी अभ्यासक्रमातून बाहेर पडून काय करू शकेल याचे सुद्धा ज्ञान विद्यार्थ्याला देणे आवश्यक आहे नसता विद्यार्थी उच्च शिक्षणापासून दूर जाईल ही भीती सुद्धा विद्यार्थी व पालक यांच्या मनामध्ये घर करून बसणार आहे. त्याचबरोबर भारत देश हा वेगवेगळ्या जाती धर्माचा संस्कृतीचा देश आहे. भारतीय राज्यघटनेने शेड्युल्ड कास्ट व शेड्युल tribe या समुदायाला सामाजिक व राजकीय आरक्षण दिलेले आहे. हे आरक्षण संपुष्टात येईल व आपल्यावर अन्याय होईल ही मागासवर्गीयांची भावना ही या निमित्ताने निर्माण झाली आहे. याबाबतीत या घटकाला अवगत करणे गरजेचे आहे तरच या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची परिणामकारकपणे प्रभावी अंमलबजावणी होईल याची काळजी घ्यावी लागणार आहे. त्यानंतर शिक्षक वर्गात सुद्धा आपले वर्क लोड कमी झाले तर आपल्या नोकरीवर गंडांतर येईल ही जी भीती शिक्षकांच्या मनात बसत चालली आहे याबाबतीत शासन स्तरावर योग्य ती काळजी व चर्चा होणे गरजेचे आहे

याचबरोबर आणखी एक महत्त्वाचे आव्हान या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोर आहे ते म्हणजे येऊ घातलेले परदेशी शिक्षण व विद्यापीठे व त्यांची वाढणारी आवाढव्या fees याबाबतीत शासनाने परदेशी विद्यापीठावर अभ्यासक्रमाची फीस वाढणार नाही याची काळजी घेणे व कठोर निर्बंध ठेवणे आवश्यक आहे तरच या भारत देशातील मागासवर्गीय विद्यार्थी उच्च व गुणात्मक शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ही काळाची गरज आहे. बदल आवश्यक आहेत तरच आपला सामाजिक व शैक्षणिक विकास होणार आहे व त्या माध्यमातून परिवर्तन होणार आहे. सामाजिक घटकांनी याबाबतीत सकारात्मक भूमिका घेणे गरजेचे आहे. काही बाबी आपल्या पाल्याला समजावून सांगून व चर्चा करणे गरजेचे आहे. काळानुरूप नोकरीच्या मागे न लागता स्किल बेसड अभ्यासक्रम शिकून योग्य ते ज्ञान संपादन करून किमान एखादा लहान उद्योग आपल्याला सुरू करता येतो का याचा विचार करणे व उद्योगाकडे वळणे ही आजच्या व्यावसायिक काळाची गरज आहे. योग्य व परिणामकारकपणे शिस्तबद्ध राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी झाली तर हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारतासाठी वरदानच ठरणार आहे.

**(लेखक सदस्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 महाराष्ट्र राज्य समिती अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद)**

# शासकीय अधिस्वीकृती समितीवर बेकायदेशीर नियुक्त्या

## वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली माहिती विभागाच्या अजब कारभाराविरुद्ध राज्यभर आंदोलन

मुंबई : धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना, पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणून देण्यात आलेल्या नियुक्त्यात तत्काळ रद्द करा. सेवाभावी संस्था आणि संघटना नोंदणीचे स्वतंत्र कायदे आणि विभाग असताना चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव मंजूर करणाऱ्या माहिती आणि जनसंपर्क विभागातील संबंधितांची चौकशी करुन कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली आहे. राज्य पत्रकार संघाच्या वतीने सोमवारी राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देऊन रोष व्यक्त करण्यात आला.


















































# डॉ. संतोष देशमुख यांच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमा ग्रंथास पुरस्कार

## मसापच्या दामाजीनगर शाखेचे पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मंगळवेढा :** महाराष्ट्र साहित्य परिषद दामाजी नगर शाखेच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. २०२२ मध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यकृतीना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत, अशी माहिती कार्याध्यक्ष दिगंबर भगरे यांनी दिली.

पुरस्कार विजेते असे – १. पंढरीनाथ जोशी पुरस्कृत विशेष पुरस्कार मातोश्री लक्ष्मीबाई भास्कर जोशी स्मृती पुरस्कार – नाती बांझ होताना (कवितासंग्रह) मनीषा पाटील हरोलीकर देशिंग २. दिगंबर यादव पुरस्कृत पद्मीनी कृष्णा यादव स्मृती पुरस्कार – तुकोबा (कवितासंग्रह) डॉ. राजेंद्र दास, कुर्डुवाडी, ३. लहु ढगे पुरस्कृत सिध्दमाला ढगे स्मृती पुरस्कार – राजकिय मानदंड भाई गणपतराव देशमुख (चरित्र) – प्रा. डॉ. किसन माने, सांगोला

४. गिरीश पंडित पुरस्कृत मारोतीराव पंडित स्मृती पुरस्कार – हिप्पोक्रेटिसची शपथ – (कादंबरी) – डॉ. ऊर्मिला चाकुरकर, पैठण, ५. डॉ. शरद शिर्के पुरस्कृत इंदुमती शिर्के स्मृती पुरस्कार – हरवलेल्या कथेच्या शोधात (कथासंग्रह) – सिताराम सावंत, सांगोला ६. प्रकाश जडे पुरस्कृत इंदुमती जडे स्मृती पुरस्कार – मुक्ता (कादंबरी) – प्रतिभा जगदाळे, सांगली ७. संभाजी सलगर पुरस्कृत, ज्ञानोबा सलगर स्मृती पुरस्कार – पिपाणी (ललित) – विजय शेंडगे, पुणे ८. पंढरीनाथ जोशी पुरस्कृत मोहन भास्कर जोशी स्मृती पुरस्कार – पद्मकोश (कादंबरी) – रश्मी पदवाड मदनकर, नागपुर. ९. प्रा. पठाण शिवशरण पुरस्कृत, मसाजी शिवशरण स्मृती पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता (संशोधनात्मक संपादन) – प्रा. डॉ. संभाजी पाटील, लातुर १०. श्रीमती ठोंबरे पुरस्कृत, शहिद राजकुमार ठोंबरे स्मृती पुरस्कार – ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमा (संशोधनात्मक) – प्रा. डॉ. संतोष देशमुख, औरंगाबाद

११. उदय इंगळे पुरस्कृत, अमोल इंगळे स्मृती पुरस्कार – सुरस धातु गाथा (बालसाहित्य) – प्रा. डॉ. सुनिल विभुते, बार्शी १२. इंद्रजित चव्हाण पुरस्कृत, सुरेश दनु स्मृती पुरस्कार, हिरवी हिरवी झाडे (बालसाहित्य) – प्रा. सुभाष कवडे, भिलवडी १३. श्रीमती वासंती मेरु पुरस्कृत, वासुदेव शंकर मेरु स्मृती नवोन्मेष पुरस्कार – यशवंती शिंदे (मंगळवेढा). १४. निशिकांत परचंडराव पुरस्कृत, चंद्रकला रल्हाद परचंडराव स्मृती, साहित्यप्रेमी पुरस्कार – कल्याणराव शिंदे (पंढरपूर) या पुरस्कारांची निवड डॉ. दत्ता सरगर यांचे अध्यक्षतेखाली रेखा जडे, प्रा. विश्वनाथ ढेपे, भारती धनवे, सचिन गालफाडे यांचे समितीने केली आहे. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती शाखा अध्यक्ष प्रकाश जडे यांनी दिली आहे.

# सावधान..! सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट कराल तर भोगावी लागेल जेल

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** सोशल मीडियाचा वापर करताना प्रत्येक जणांनी आता सतर्क राहिले पाहिजे. समाजातील प्रत्येक घडामोडीवर आपले मत व्यक्त करण्यासाठी समाज माध्यम हे प्रभावी ठरत आहे. नीतीमूल्यांची जाण ठेवून सोशल मीडियाचा वापर विधायक कामासाठी केला तर तो नक्कीच चांगला आहे, मात्र त्यातून अनेकदा विध्वंसक कृतेही केली जातात. हे अनेक ठिकाणी सायबर गुन्ह्याची नोंद झालेल्या आकडेवारीवरून सिद्ध होते. त्यासाठी सोशल मीडिया वरून आक्षेपार्य जातीयतेढ, सामाजिक भावना, धार्मिकतेढ अथवा वैयक्तिक कोणाची बदनामी होईल अशा स्वरूपाच्या व्हिडिओ क्लिप, ऑडिओ क्लिप, वा तत्सम स्वरूपाच्या मजकूर पोस्ट करू नका. किंवा शेअर सुद्धा करू नका. तो कायद्याने गुन्हा ठरत असून, त्या संदर्भात तक्रार आल्यास त्वरित कारवाई केल्या जाते. त्यासाठी सावधान..! सोशल मीडियावर आक्षपार्ह पोस्ट कराल तर; गुन्हेगार ठराल. याविषयी वाशिम पोलिसांनी विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. जिल्ह्यातील रिसोड शहरात ठाणेदार देवेंद्र सिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनात विविध भागात, प्रमुख चौकात, व मुख्य रस्त्यावर समाज माध्यमातून धार्मिक भावना दुखावू नका..! असे पोस्टर झळकत आहे. सध्या राज्यात विविध जातीय, धार्मिक, हिंदू



मुस्लिम, आरक्षणाचा मुद्दा, आदी विषयावर भडकाऊ भाषणे करून युवकांची माथी भडकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी काही विशेष छुप्या आयटीसेल टीम कार्यरत असून सदर टीमकडून विविध जाती-धर्माच्या विरोधात बदनामीकारक संदेश तयार करणे, तसेच नेते मंडळीच्या विरोधात आक्रमक पवित्रा निर्माण होईल असे संदेश बनवून ते समाज माध्यमातून प्रसारित केले जातात. या मीडियावर काही समाजभान नसलेले आणि विघ्न संतोषी लोकांचाही मोठा भरणा असल्याने ही मंडळी जहाल, तीव्र, भडक, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या, शांतता भंग करणाऱ्या, वात्रट पोस्ट शेअर करण्यावरच जास्त भर देतात. यातील एखादी जरी पोस्ट चुकून, नकळत, अनावधानाने किंवा भावनेच्या भरात जाऊन शेअर केल्या जाऊ शकते.




# वेगवान सरकार वेळेवर पगार का देत नाही?

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गतिमान सरकार वेगवान निर्णय म्हणून जनतेच्या पैशावर स्वतःची जाहीरात करणारे शिंदे फडणवीस सरकार महिन्याची 17 तारीख उलटूनही कोविड योद्यांचा तोकडा पगारही देऊ शकत नाही, याचा निषेध करीत अनेक मागण्यांसाठी आयटक संलग्न महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटनेने घाटीत हॉस्पीटलमध्ये जोरदार निदर्शने केली.

याबाबत असे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कथित कंत्राटी कामगार यांनी वारंवार मागणी करूनही आपल्या प्रशासनातर्फे कार्यवाही होत नाही, याउलट वेगवेगळ्या पध्दतीने कामगार कायद्यास धुडकावून कोविड योद्धे म्हणुन ज्यांचा गौरव केला अशा कामगार कर्मचारी यांचे शोषण सुरूच आहे, यावर महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटनेच्या वतीने आपणास वेळोवेळी तोंडी/ निवेदने देऊन अधिष्ठातांना वेळोवेळी माहीती दिली तरीही दुर्लक्ष करण्यात येते ही बाब अतिशय संतापजनक आहे,

असे डॉ संजय राठोड अधिष्ठाता यांना निवेदन देऊन सांगण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. घाटी गरीबांच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, घाटीचे खाजगीकरण चालणार नाही, समान काम समान वेतन मिळालेच पाहीजे, घाटीत एन्जीओप्लस्टी झालच पाहीजे, औषध मोफत मिळालेच पाहीजे, 27 डॉक्टरांच्या बदल्या रद्द झाल्याच पाहीजे, दलाली करणे बंद करा, चिठ्ठ्या देण बंद करा, 7 तारखेपर्यंत पगार झालाच पाहीजे, पोलीस पडताळणीसाठीचे 500 कोण देणार जवाब दो ई. घोषणा देण्यात आल्या. अधिष्ठाता डॉ संजय राठोड यांना दिलेल्या निवेदनात

1) कथित कंत्राटी कामगारांना किमान वेतन देण्यात यावा 2)पीएफ नियमितपणे जमा करण्यात यावा. 3) वेतन कामगार कायद्याप्रमाणे एक ते दहा तारखेपर्यंत जमा करण्यात यावा.

4) सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे खाजगीकरण रद्द करा.

5) पोलिस पडताळणी प्रमाणपत्राची अट रद्द करावी.

6) सुपर स्पेशालिटी भरतीत सद्यस्थितीत काम करणाऱ्या कथित कंत्राटी कामगारांना विनाअट सामावून घ्यावे.

7) घाटीतुन बदली केलेले 27 डॉक्टर परत द्या ई मागण्या करण्यात आल्या. यावेळी चर्चे दरम्यान घाटीला अजुन 4 सिटी स्कॅन मशिनची आवश्यकता असल्याचे डॉ राठोड यांनी सांगीतले, पगार 10 तारखेपर्यंत न झाल्यास ठेका रद्द करुत असा इशाराही ठेकेदाराला त्यांनी दिला, पी एफ , इएस आय ची थकबाकी व प्रक्रीया पुर्ण करण्याचे आदेश दिले, पोलीस पडताळणीचे 500/- ठेकेदाराने खर्च करावे असेही ते म्हणाले, या कामगारांना सेवेत सामावुन घ्या मग खुशाल पोलीस पडताळणी करा असे शिष्टमंडळाने सांगीतले, 27 डॉक्टर्सना आम्ही रिलीव्ह करणार नाही असेही राठोड म्हणाले, घाटीचे खाजगीकरण चालणार नाही असेही आयटकने निक्षुन सांगीतले, कथित कंत्राटी कामगारांना सुपर स्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये सेवेत सामावुन घ्यावेच लागेल असेही युनियनने सांगीतले.



# वडोद बाजार येथे अण्णा भाऊ साठे स्मृतिदिन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वडोद बाजार येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. वडोद वस्ती येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सामाजिक सभागृहात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार रमेश दनके ग्रामपंचायत सदस्य शेख राजिक, साबिर पठाण, ताजा मत शहा, अजिनाथ वाघ , राजू मस्के, शिवाजी काटकर, अखिल शेख गणेश दनके, विशाल दनके, रमेश डिडोरे मिलिंद नवतुरे गौतम नवतुरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# चार्टर्ड अकाऊंटटच्या परीक्षेत रिजवाना शेख विशेष प्रावीण्यसह उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकाऊंटंटस् ऑफ इंडिया (आय.सी.ए.आय), औरंगाबाद यांच्या वतीने संस्थेच्या ७५ व्या अमृतवर्षानिमीत्त या वर्षी विशेष प्राविण्यासह चार्टड अकाऊंटंट परिक्षेत उत्तिर्ण झालेल्या सी.ए चा सत्कार औरंगाबादचे खा. इमतियाज जलील यांच्या हस्ते दि. १६ जुलै २०२३ आय.सी.ए.आय भवन, बीड बायपास, औरंगाबाद येथे करण्यात आला. यात सत्कारमुर्ती म्हणुन नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीचे संचालक डॉ.ए.एच. शेख यांच्या कन्या रिजवाना शेख यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आय.सी.आय. चे सिनेट सदस्य चार्टर्ड अकाऊंटट उमेश शर्मा, चेअरमन चार्टर्ड अकाऊंटट गणेश भालेराव हे उपस्थित



होते. उमेश शर्मा यांनी सर्व उत्तिर्ण झालेल्या चार्टड अकाऊंटना विशेष मार्गदर्शन केले, सी.ए झाल्यानंतर कोणकोणत्या जबाबदाऱ्यांना सामोरे जावे लागते, अर्थाजन प्राप्त करण्यासाठी नैतिकता कशी बाळगावी, देशाची अर्थ व्यवस्था बहुतांश सी.ए च्या लेखा परिक्षणावर अवलंबुन असते त्यामुळे नैतिकतेनेच हा व्यवसाय करावा असा सल्ला दिला त्यांनी दिला . खा. इमतीयाज जलील यांनी सुध्दा आपल्या शैक्षणिक जीवन प्रवासाचा संदर्भ देऊन मार्गदर्शन केले. अतिशय उत्कृष्णपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमास नूतन सी.ए सह त्यांचे नातेवाईक उत्साहपूर्ण या कार्यक्रमास उपस्थित होते.



# संत जनाबाई अजूनही उपेक्षितच : प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये

## सकल भावसार समाजाच्या वतीने गंगाखेड येथे संत जनाबाईंच्या पुण्यतिथीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगाखेड :** येथील संत जनाबाई महाराजांच्या जन्म स्थळ असलेल्या गंगाखेड येथील मंदिरात आयोजित संत जनाबाई यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी 'अजूनही संत जनाबाई उपेक्षितच आहेत' अशी खंत व्यक्त केली! सकल भावसार समाज संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने यावर्षी पहिल्यांदा संत जनाबाईंच्या पुण्यतिथीचे आयोजन गंगाखेड येथील संत जनाबाई जन्म स्थळी असलेल्या मंदिरात करण्यात आले होते. या निमित्ताने विविध कार्यक्रमासोबत प्रा.डॉ.जायभाये यांचे प्रवचन आयोजित केले होते. प्रवचनात विद्रोही संत जनाबाईंच्या अभंग आणि त्यांच्या जीवनावर प्रकाश



टाकताना तत्कालीन एकाही संतांने जनाबाई यांच्यावर एक अभंगसुद्धा लिहिला नाही. दुसरीकडे मात्र सर्वच्या सर्व संतांची चरित्रे जनाबाईंनी आपल्या अभंगातून लिहिली. एवढे मोठे उदात्त मातृभाव घेऊन जनाबाई संतत्वाला पोहोचल्या. नामदेवांना कडे-खांद्यावर खेळवले, ज्ञानदेव-मुक्ताबाईचे अश्रू पुसले. सावतोबा, चोखोबा, बंकोबा यांना आधार दिला. जनाबाई सर्व संत मांदियाळीत जेष्ठ होत्या आणि सुदैवाने त्यांना पांडुरंगाने श्रेष्ठत्व बहाल केले होते. जनाबाईंनी आपल्या भक्तीच्या बळावर संतपन हस्तगत केले होते! जनाबाईला श्री विठ्ठल दळू-कांडू लागायचा. गोवऱ्या थापणे, वेचने एवढेच काय झाडून काढल्यानंतर कचरा भरण्याचे काम देव करायचा! हे सारे वचमत्कार बाजूला ठेवून आपण साक्षेपी चिंतन करतांना संत



जनाबाईंनी या सर्वच कामात प्रत्यक्ष पांडुरंग पहिला. हाच वारसा पुढे संत गाडगेबाबांनी चालवला. एवढं करूनही जनाबाई स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेतात! त्यांच्या नावावर उनपुरे तीनशे अभंग आहेत.

आत्तापर्यंत त्यांच्यावर दोन-तीन ग्रंथ लिहिले असले तरी ज्या प्रमाणात संत जनाबाई एक विद्रोही, रोखठोक स्त्री संत म्हणून पुढे यायला हवी होती तेवढे काम त्यांच्यावर झाले नाही. आज भावसार समाजाने आपल्या संपूर्ण शक्तीने संत जनाबाईंच्या लेखनाचा प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन डॉ.जायभाये यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ.रेणुका भावसार, अध्यक्ष जगदीश चव्हाण, द्वारकदास फटाले, गुलाबराव भावसार, लक्ष्मीकांत कंकाळ, अर्जुन पुरनाळे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गंगाखेड भावसार समाजातील युवकांनी सहकार्य केले. याप्रसंगी संत जनाबाई आणि संत नामदेव प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष उपस्थित होते.

# ग्रामविकास अधिकाऱ्यामुळे विकास खोळंबला

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** सुलतानपूर ही ग्रामपंचायत तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून ग्रामपंचायतची निवडणूक होऊन सात ते आठ महिने होत आहे. परंतु ज्या पद्धतीने कामे व्हायला पाहिजे त्या पद्धतीने कामे होत नाहीत. गेल्या तीन ते चार महिन्यात पूर्वी मासिक सभेमध्ये आर्थिक मंजूरात घेण्यात आली परंतु प्रत्यक्षात कुठलेच कामे होत नाही. त्यामध्ये वाटर फिल्टरचे पन्नास हजारांचे साहित्य धुळखात पडले आहे. तरी तक्रारीची गाभीर्याने दखल घेऊन त्वरित तत्पर काम करणारे ग्राम विकास अधिकारी सुलतानपूर ग्रामपंचायतला देण्यात यावे. सरपंच पती यांच्या वारंवार तक्रारी करून सुद्धा सरपंच पतीचा ग्रामपंचायत मधला हस्तक्षेप थांबता थांबेना मासिक मिटींगमध्ये सरपंच पती घुसून विनाकारण कार्मामध्ये हस्तक्षेप करून अडथळा करत आहेत त्यांचा हा हस्तक्षेप थांबून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सुलतानपूर येथे सन २०२१/२२ मध्ये झालेल्या तांडा वस्ती काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले दलित वस्ती योजनेअंतर्गत वार्ड क्रमांक



५ मध्ये २० लाख रुपयांचे सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे या कामाची क्वॉलिटी कंट्रोलद्वारे चौकशी करून या कामाचे बिल अदा करू नये.

यासाठी मासिक सभेमध्ये विरोध करून चर्चा करण्यात आली तसेच लेखी सुद्धा देण्यात आले.परंतु सरपंच यानी त्यांच्या सरपंच पदाचा गैरवापर करून सभेत बिल अदा करण्याचा ठराव मंजूर केला ज्याची सुद्धा चौकशी करण्यात यावी. ग्रामसभेमधील व मासिक सभेच्या ठरावाची अंमलबजावणी होत नाही. वरील सर्व विषय गांभीर्याने घेऊन त्वरित कारवाई करण्यात यावी अन्यथा आम्ही गावकरी आपल्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन करू होणाऱ्या सर्व परिणामाचे जबाबदारी आपणावर राहील करिता तक्रार निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती लोणार यांच्या कडे देण्यात आले.या निवेदनावर नागवंशी संघपाल पनाड वंचित नेते तथा ग्रामपंचायत सदस्य, संतोष राधाकिसन शिंदे ग्रामपंचायत सदस्य, जंबून बी शेख अहेमद ग्रामपंचायत सदस्य,सरस्वती बाई निरमळे ग्रामपंचायत सदस्य, समीना बी जाकीर खा ग्रामपंचायत सदस्य, राजेका परविन जियाउल्ला ग्रामपंचायत सदस्य, सुमनबाई मारोती पनाड, रूपाली दीपक राजगुरू, सीमा संतोष पवार, अनंता दौलतराव अनित्य डिंगावर घेवदे,शेख अखतर शेख कौसर,जाकीर खान शौकत खान,अ. जियाउका अ.ईनायात,शेख अमीर शे अहेमद,किरण दिलिप पनाड,संदेश गणेश पगाड,वैभव अनिल पनाड,राजहंस रामेश्वर जावळे, राहुल पनाड,पंकज वसंता निर्मळे यांच्या सह्या आहेत.

# माळीवाडा येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज


**दौलताबाद :** येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची ५४वी पुण्यतिथी साजरी माळीवाडा येथील लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास मान्यवराचा हस्ते हार घालुन पुजन करण्यात आले. यावेळी सरपंच अनिता हेकडे, उपसरपंच कडू किर्तीकर , ग्रा.पं. मनेश गाजरे, कृष्णा मुळे, नाना बर्डे, सुधाकर हेकडे, सोमनाथ भगत, अविनाश गाणार, नितीन वानखेडे, ग्रा.पं. सदस्य कमलबाई आस्वार, पोलिस पाटील प्रमोद साठे, पत्रकार अभय विखनकर, सुखदेव खडागळे, शिवाजी आस्वार, गणेश अस्वार, प्रदीप अस्वार, भागिनाथ अस्वार, असाराम अस्वार, सतिष अस्वार, शुभम खंडागळे, बंडू अस्वार, रामभाऊ आस्वार, किशोर आस्वार, किरण आस्वार, शुभम गायकवाड, आप्पासाहेब अल्हाट, सचिन सौदागर, आसाराम आस्वार, कैलास आस्वार, भास्कर आस्वार, किशोर आस्वार, गौरव ठोकळ, कारभारी आस्वार बाळू आस्वार, रामभाऊ आस्वार, संजय खडागळे, बंडू आस्वार, अनिल बागूल, अनिल आस्वार, समिर तुपे, किरण आस्वार तसेच समाज बांधवाची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीवर डॉ.प्रकाश खांडगे, डॉ. गणेश चंदनशिवे, शेखर भाकरे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे संशोधन करणे, यासंदर्भात सल्ला देणे व असे लोकसाहित्य प्रकाशित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे अभ्यासक तथा कलावंत डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. गणेश चंदनशिवे, शेखर निरंजन भाकरे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दि.17 जुलै 2023 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. यात महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती महाराष्ट्र राज्य पुणे या समितीचे पुनरगठन करण्यात आले असून शाहीर





हेमंत मावळे अध्यक्ष तर डॉ.मोनिका ठक्कर, डॉ.गणेश चंदनशिवे, डॉ. प्रकाश खांडगे, शेखर निरंजन भाकरे, मार्तंड कुलकर्णी, प्रणव पाटील, संगीता बर्वे यांची सदस्यपदी तर भावार्थ रामचंद्र देखणे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली. सदर समितीची मुदत तीन वर्षांपर्यंत राहणार आहे. या निवडीबद्दल सर्वाचे अभिनंदन होत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# गांधी - आंबेडकर ऑक्सीजन ओझोन : डॉ. ऋषिकेश कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर प्रतिनिधी :** गांधीजी हे देशाचे ऑक्सिजन असेल तर बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे ओझोन आहेत. या दोघांनाही सोडून देश चालवाल तर देश मरणप्राय होईल, असे प्रतिपादन होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेने महात्मा गांधी स्मारक निधी हॉल मध्ये आयोजित केलेल्या गांधी - आंबेडकर व देशाचे भवितव्य या विषयावर बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे यांनी केले.

पुढे बोलताना डॉ. कांबळे म्हणाले, अखंड भारताचा भूगोल, समाज आणि संस्कृती फक्त गांधी आंबेडकर यांनाच माहिती होती. बाबासाहेबांचे तर समाज संस्कृतीचे आकलन पाहिले की आपण अवाक होतो. गांधी - आंबेडकर वादाबाबत बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे म्हणाले, गांधीजी आणि बाबासाहेब आंबेडकर यांचा तीव्र संघर्ष हा एक तपाचा होता, ही इतिहासाची साक्ष आपल्याला बाजूला सारता येत नाही पण १९३२ ला पुणे करार झाल्यानंतरच्या काळात गांधीजी बाबासाहेबांना समजून घ्यायला लागले. जेव्हा देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या तेव्हा बॅरिस्टर सावरकरांनी मुस्लिम लीग सोबत युती करून निवडणुका लढवल्या होत्या मग मुस्लिमांचा द्वेष कशासाठी करायचा ? असा रोष डॉ ऋषिकेश कांबळे यांनी केला. गांधी आंबेडकर संबंधात बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे म्हणाले, १९३७ नंतरच्या काळात बाबासाहेबांच्या अनेक भूमिकांचे महात्मा गांधी यांनी समर्थन केलं होतं. स्त्रियांच्या बाळंतपणाच्या रजा, कामगार नोकरदारांच्या बारा तासाचा अवधी आठ तासावर आणणे या बाबासाहेबांच्या भूमिकांचे गांधीजीने समर्थनच केलेले होते. गांधीजी आणि आंबेडकर यांच्या लढ्याबाबत बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे म्हणाले, गांधीजी आणि आंबेडकर यांचे लढे हे अहिंसक होते. गांधीजींनी जैन तत्त्वज्ञान स्वीकारले होते तर बाबासाहेबांनी बौद्ध तत्त्वज्ञानातील तत्त्व अंगीकारली होती. दोघांचेही सर्वसामान्य माणसाविषयीची कळवळ, करुणा दोघांच्याही ठायी दुःखितांच्या विषयाची करुणा होती होती. दोघांच्याही प्रश्नात्मतेचा पाया मानवता वाढ हाच होता. राष्ट्रांच्या दोघांच्याही जडणघडणीचा सर्वसामान्य माणूस हाच श्वास होता.



बाबासाहेबांच्या घटना मसुदा समितीत समाविष्ट बाबतीत डॉ ऋषिकेश कांबळे यांनी सांगितले की देशाच्या फाळणीनंतर गांधीजींच्या आग्रहापोटी बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटना समितीत समावेश करावा लागला आणि गांधीजीच्याच आग्रहापोटी बाबासाहेब घटना मसुदा समितीत समाविष्ट झाले हे सांगताना डॉ ऋषिकेश कांबळे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे यांचा खंड १८ भाग ३ याचा संदर्भ दिला. शेवटी बोलताना डॉ ऋषिकेश कांबळे यांनी सांगितले की, गांधी आंबेडकरांच्या धर्मनिरपेक्षतेच्या विचाराशिवाय देश चालू शकत नाही त्यांना बाजूला सरणं म्हणजेच देश विकलांग करून घेणे आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक विचारवंत डॉ शेषराव चव्हाण हे लाभले होते, त्यांनी सध्याच्या राजकारणावर भाष्य केलं त्यांनी सांगितलं की आता राजकारणात नीतिमत्ताच राहिली नाही. यावेळी होल्डिंग हँड्स संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांनी डॉ ऋषिकेश कांबळे आणि डॉ. शेषराव चव्हाण यांचे स्वागत केले. संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र बनकर यांनी सूत्रसंचालन केले तर महात्मा गांधी स्मारक निधीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र गोर्डे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. भरत कदम, वर्षा जैन, इंद्रकुमार जेवरीकर, प्राची सिरसीकर, प्रमिला कुलकर्णी, सस्मिता डोंगरे, उमेश डोंगरे, ॲड. अभय टाकसाळ, भगवान वाघ, सिद्धार्थ गायकवाड, शरद बोरसे, प्रतिभा बोरसे, शाम तोडकर, शशिकांत दोंडे, विकास खरात, राजेंद्र दाते पाटील, डी. एस. काटे, विलास डंगारे, शाम तोडकर, अमीर सोहेल शेख, अविनाश वाघमारे, भीमसेन कांबळे, राजेंद्र केदारे, ॲड. संदीप पाटील, हेमंत बर्वे, रामदास गायकवाड, डॉ. सुधाकर नवसागर, देविदास शेळके, अक्षय घुगे, सत्यनारायण ढवळे इत्यादी उपस्थित होते.



# महाराष्ट्रामधील दुर्गम भागात सर्प जनजागृती कार्यशाळा घेणे गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आपण पाहतोय आता वरूण राजाचे आगमन झाले आहे. सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. नदी, ओढे वाहू लागले आहेत. शेतकरी राजा आपल्या काळ्या आईच्या मशागतीच्या कामाला लागला आहे.

पण हा काळ म्हणजे साप व अंड्यातून त्याची पिल्ले बाहेर येण्याचा काळ असतो. त्यामुळे सर्पदंशाचे प्रमाणही या दिवसांत जास्त असते. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनची टीम पुणे जिल्ह्यात व तालुक्यातील विविध शाळा, कॉलेज, महाविद्यालय, अनाथ आश्रम, दुर्गम भागातील वाड्या वस्त्या अशा गावांत सर्प जनजागृती कार्यशाळा घेण्यात येत आहेत. पुणे जिल्ह्यातील व तालुक्यातील डोंगराळ तालुक्यात तसेच वेल्हे, भोर, पुरंदर, मुळशी, व हवेली तालुक्यातील काही भाग तसेच, दुर्गम वाड्या, वस्त्या, धनगरवाडे आदिवासी वाडे, कातकरी वस्त्या याच्या भोवताली जंगल खूप प्रमाणात आहे. तसेच या ठिकाणी सर्पदंशाचे प्रमाण जास्त असते. पानशेत, मढेघाट या भागाकडील त्यात पुरेशी माहिती नसल्याने बरेच सर्पदंश झालेले रुग्ण दगावतात व त्या भागात लगेच उपचार सोय मिळत नसल्याने माणूस दगावत आहे . रात्रदिवस रानात राबणाऱ्या शेतकरी कष्टकऱ्यांसाठी साप व सर्पदंश हे फार गंभीर विषय बनलेले असतात . बऱ्याच ठिकाणी माहिती अभावी व अज्ञानामुळे बिनविषारी साप चावला व्यक्ती तरी फक्त भीतीने दगावते जरी विषारी साप चावला तर गावातील मांत्रिक किंवा साधूबाबाकडे जाऊन जीव गमावत आहेत. यासाठी महाराष्ट्र, पुणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यामध्ये व शाळेमध्ये, गावात कार्यशाळेद्वारे जनजागृती सुरू आहे . सर्प जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळा, विविध संघटना, रोटरी क्लब, कंम्पनी यांनी पुढाकार घ्यावा व वन्यजीवरक्षक किंवा सर्पमित्रांना संपर्क करावा. पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनची टीम प्रत्यक्ष येऊन कार्यशाळा घेईल, असे आवाहन पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष सुशील विभुते , उपअध्यक्ष शंकर वाडकर, गणेश माने, अजिंक्य उनवणे, विनायक मुगडे सर्पमित्र विशाल शिंदे, रघुनाथ वाडकर, विलास धोंगडे, श्रीकांत खेडकर, सनी कडके, विनायक मोहिते, संतोष पाटील, दीपक जाधव यांनी केले आहे. कार्यशाळा घेण्यासाठी संपर्क 94232 13283

# विकास काय असतो ? अन् तो कसा करायचा ते 'दादा'कडूनच शिकावे

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** अनेक वर्षांपासून कंधार लोहा तालुक्याच्या विकासाचा बॅक लॉग असून तो भरून काढायचा असेल तर या मतदारसंघाला एकनाथ दादा पवार यांच्या शिवाय पर्याय नाही. ते सत्तेत नसतानाही मतदार संघातील अनेक ग्रामपंचायतीला शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे विकास काय असतो ? आणि तो कसा करायचा असतो ? याचा उत्तम आदर्श म्हणजे 'दादा'च आहेत, असा सामूहिक सूर पांगरा येथील सभेत उमटून दोन हजारांच्या वर असलेल्या नागरिकांनी दादाला आमदार करण्याची महादेवाला साक्षी ठेवून प्रतिज्ञा घेतली.

एकनाथ दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली कंधार तालुक्यातील पांगरा येथील महादेव मंदिरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने रविवारी स्नेह मेळावा व डब्बा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी पांगरा येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष घोरबांड हे होते. तर प्रमुख उपस्थितीत भाजपाचे ज्येष्ठ नेते केरबा सावकार बिडवेई, देवीदास महाराज गिते, सदाशिव अंभुरे, दत्ताभाऊ शेंबाळे, बालाजी परदेशी, व्यंकट गव्हाणे, ब्रह्मानंद सिरसाट, माधव जाधव, प्रा. कंटिराम लुंगारे,जलदूत बसवदे, शितळे, दिगंबर लुंगारे, नागनाथ चुडावकर, गजानन मोरे, बजरंग यादव, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. 'एकच वादा एकनाथ दादा" च्या घोषणा...! यावेळी दादानी चिंचवड महानगर पालिकेला आशिया खंडातील सर्वात मोठी चिंचवड महानगर पालिका म्हणून वैभव प्राप्त करून दिले.एक सोज्वळ, शेतकऱ्यांना हमी भाव देणारा, विकास काय असतो ते दाखवून देणारा, सच्चा, समाजाबद्दल तळमळ असलेला, तालुक्यातील घराणेशाहीवर पाबंदी घालू शकणारा, रोजगार निर्माण कराणारा,आपला विचार करणारा, मतदारांना खाली बघू देण्याची वेळ येऊ न देणारा नेता आहे. तालुक्यातील २५हजार तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणारा, दूरदृष्टी असलेला नेता म्हणजे एकनाथ दादा पवार आहेत, याही पुढे जाऊन आता 'एकच वादा एकनाथ दादा' अशा प्रतिक्रिया आपल्या मनोगतातून सदाशिव अंभुरे, धर्मवीर संघटनेचे बाळासाहेब जाधव, व्यंकट गव्हाणे, दत्ताभाऊ शेंबाळे, बालाजी परदेशी, देवीदास महाराज गिते, व्यंकट गव्हाणे, ब्रह्मानंद सिरसाट,केरबा सावकार बिडवई आदिंनी नोंदविल्या. पांगरा येथील सभेत एकनाथ दादा पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व मूळ भाजपा जपणारे, वाढवणारे भाजपाचे केरबा सावकार बिडवई, देवीदास महाराज गिते, सदाशिव अंभुरे, प्रा. कंटिराम लुंगारे, नागनाथ चुडावकर व त्यांचे सर्व सहकारी हे अंगार आहेत. ते आता एकनाथ दादा पवार यांच्या आमदारकीच्या विजयासाठी सरसावले आहेत. 'आता एकच वादा, कंधार लोह्याचा आमदार एकनाथ दादा !' अशी घोषणा देवीदास महाराज गिते यांनी तर 'एकच वादा एकनाथ दादा' अशी घोषणा दत्ताभाऊ शेंबाळे यांनी यावेळी दिली. तर अनुसूचित जाती जमाती सेलचे माधव जाधव यांनी लोहा कंधार तालुक्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर मन्याडखोरी शैलीत आपली तोफ डागून एकनाथ दादा पवार यांच्या विजयासाठी सरसावले. त्यानंतर एकनाथ दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करून विकासाची दिशा व आपल्या उमेवारीची पक्की असल्याचे निक्षून सांगितले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर